cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२० | शनिवार दि.३१ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

शून्याचा सोयीस्कर जल्लोष आणि वास्तवाचे विस्मरण!

विधान परिषदेच्या निवडणुका म्हणजे मतदारांची मर्यादित संख्या आणि मोजकेच मतदारसंघ. परंतु, या निवडणुकांना भाजपने दिलेले महत्त्व पाहता, जणू काही देशाचे भवितव्य याच निवडणुकांवर अवलंबून आहे, असा आव आणला जातो. प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना, विशेषतः काँग्रेसला चितपट करण्याचा विडा उचलायचा आणि निकालानंतर आपल्या विजयाचा मोठा गाजावाजा करायचा, हा शिरस्ता बनला आहे. मात्र, या राजकीय आतषबाजीत भाजपच्या पदरी आलेले अपयश आणि विरोधकांनी दिलेले धक्के कसे सोयीस्करपणे झाकले जातात, याचे उत्तम दर्शन अलीकडील विधान परिषद निकालांनी घडवले आहे.

थोडक्यात...

उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर कोसळले; ६ जणांचा मृत्यू

बद्रीनाथः बद्रीनाथ धाम येथून देहरादूनला परतणारे हेलिकॉप्टर शुक्रवारी (३० ऑक्टोबर) जोशीमठजवळ कोसळले. या दुर्घटनेत पायलटसह हेलिकॉप्टरमधील सहा जणांचा मृत्यू झाला. सर्व सहा जणांचे मृतदेह बचाव पथकांना सापडले आहेत. दुर्गम भागात हा अपघात झाल्याने मृतदेह रस्त्यापर्यंत आणण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. पोलिस, राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ), लष्कर आणि आयटीबीपीची पथके घटनास्थळी दाखल झाली होती. हेलिकॉप्टरमध्ये पायलट हिमांशू यांच्यासह प्रतापा, अरुण सालुंके, शंकरगौडा व्ही. जी., सुधीर के. आणि एच. एस. नागराजा हे प्रवास करत होते. सर्व प्रवासी बंगळुरू येथील असल्याची माहिती आहे. ट्रान्स भारत एव्हिएशन कंपनीचे हे हेलिकॉप्टर होते. शुक्रवारी दुपारी १ वाजून १२ मिनिटांनी बदरीनाथ येथून देहरादूनमधील सहस्रधारा हेलीपॅडच्या दिशेने हेलिकॉप्टरने उड्डाण केले होते. सुमारे १५ मिनिटांनंतर हेलिकॉप्टरचा हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाशी (एटीसी) संपर्क तुटला. त्यानंतर हेलिकॉप्टरचा शोध सुरू करण्यात आला. जोशीमठमधील चाई गावाजवळ त्याचे शेवटचे लोकेशन मिळाले होते.

शेतकऱ्यांकडून समृद्धी महामार्ग रोखण्याचा प्रयत्न

वाशिमः दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी वाशिम जिल्ह्यातील वनोजा–शेलूबाजार (ता. मंगरूळपीर) येथे ठाकरे शिवसेनेने समृद्धी महामार्गावर शुक्रवारी (दि. ३० ऑक्टोबर) रास्ता रोको आंदोलन केले. आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हजारोच्या संख्येने शेतकरी आणि शिवसैनिक रस्त्यावर उतरले. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिलेली नव्हती. पोलिसांनी बॅरिकेट्स लावून आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला. यामुळे पोलिस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली. पोलिसांनी आमदार नितीन देशमुख आणि काही आंदोलकांना ताब्यात घेतले. अकोला, वाशिम आणि बुलढाणा येथून समृद्धी महामार्गाकडे येणारी आंदोलकांची वाहने अडवण्यात आली आहेत. आंदोलनाच्या ठिकाणी मोठ्या संख्येने पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शेतकरी त्याच्या हक्कासाठी आला असून, पोलिसांनी त्याच्यावर बळाचा वापर करु नये. त्यांनी शेतकऱ्यांच्या भावना समजून घ्याव्यात. शेतकऱ्यांची वाहने रोखू नयेत. जी वाहने अडवून ठेवली आहेत ती सोडून द्याव्यात अन्यथा त्याचे परिणाम वेगळे होतील.

अंगणवाडी भत्त्या सुधारणा करा– मंत्री आदिती तटकरे

मुंबईः अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. प्रोत्साहन भत्त्याच्या सुधारित निकषांबाबत कर्मचारी संघटनांच्या मागणीसंदर्भात मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी पोषण, आरोग्य, पूर्वशालेय शिक्षण, उपस्थिती आणि गृहभेटी आदी निकषांच्या आधारे प्रोत्साहन भत्ता निश्चित करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी बैठकीस एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वी. रा. ठाकूर आदीसह अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचे तसेच गर्भवती मातांच्या पोषणाची काळजी घेण्यासाठी १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.३० ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ३९.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,९००	४,२०१	३,२१०

ज्वारी/हायब्रिड : ८३.५० क्विंटल

३,४९०	७,८५६	५,७३६

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : ५.००क्विंटल

७,४००	९,८००	८,७३३

उडीद : ५.०० क्विंटल

८,९९९	९,२००	९,०९९

बाजरी: १४.५० क्विंटल

३,५००	३,९००	३,७१७

मुग: २.०० क्विंटल

९,२००	९,३०१	९,२५०

सोयाबीन: १४२.०० क्विंटल

६,७००	६,९२५	६,८४२

हरभरा: ४.५० क्विंटल

५,८००	७,१५०	६,५१३

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळणार !

मंत्रिमंडळ उपसमितीच्या अभ्यासगटाच्या बैठकीत चाऱ्याचे दर निश्चित; पशुपालकांना दिलासा–ना.पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

दुष्काळजन्य परिस्थितीतील संभाव्य चारा टंचाईवर मात करून पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने चारा खरेदीचे दर निश्चित केले आहेत. राज्य शासनाने पशुधनासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्याची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो १२ रुपये, तर मुरघासाची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो ८ रुपये निश्चित केली आहे, अशी माहिती राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.चारा टंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांना यामुळे मदत होणार आहे.



राज्यातील खरीप हंगामातील परिस्थितीचा आढावा घेऊन आतापर्यंत एकूण ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटात ना. पंकजाताई मुंडे सदस्य असून या गटाने राज्यासह इतर राज्यांमधील चारा व्यवस्थापनाच्या उपाययोजनांचा अभ्यास करून उपलब्ध चारा, संभाव्य उत्पादन आणि आगामी काळातील गरज लक्षात घेऊन अहवाल सादर केला. या अहवालाला २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हे दर मदत व पुनर्वसन विभागाने जाहीर केलेल्या दुष्काळाच्या कालावधीसाठी लागू राहतील. जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समितीने अभ्यासगटाच्या अहवालातील तरतुदी आणि मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्देशांनुसार चारा खरेदीची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच वाहतुकीसाठी परिवहन आयुक्तांनी वेळोवेळी निश्चित केलेले दर लागू राहतील. चाऱ्याच्या गुणवत्तेबाबतही शासनाने निकष निश्चित केले आहेत. खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्यातील ओलावा कमाल १५ टक्के असावा. चारा चांगला दिसणारा तसेच आंबट किंवा कुबट वास, बुरशी, कीड आणि माती नसलेला असावा. ज्वारी आणि बाजरीच्या चाऱ्याला प्राधान्य देण्यात येणार आहे.मुरघास हवाबंद ▶▶ पान २ वर

सुका चारा प्रतिकिलो कमाल १२ रुपये; मुरघासासाठी कमाल ८ रुपये

शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना दिलासा देण्याचा प्रयत्न

राज्यातील दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर शेतीबरोबरच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होतो. पशुधन हे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन असल्याने दुष्काळाच्या काळात त्यांना चारा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. याच उद्देशाने सुका चारा व मुरघासासाठी आधारभूत दर निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ चाऱ्याचे दर निश्चित करणे एवढाच या निर्णयाचा उद्देश नसून, पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळावा, यासाठी गुणवत्तेचे निकषही ठरविण्यात आले आहेत. जिल्हास्तरावर योग्य नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणी करून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे असे पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

मुदत संपलेले अन्नपदार्थ पुन्हा बाजारात विकल्यास खैर नाही!

अमित शाह यांची लखनौमध्ये घोषणा; भाजपची नेतृत्वाबाबत भूमिका स्पष्ट, उत्तर प्रदेशात पुन्हा सत्ता आल्यास समान नागरी कायदा लागू करण्याचे आश्वासन

मुंबई । प्रतिनिधी

मुदत संपलेले आणि खराब झालेले अन्नपदार्थ नष्ट करण्याऐवजी त्यांची तारीख बदलून किंवा बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे पुन्हा बाजारात विक्रीसाठी आणण्याचे प्रकार उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आता कठोर भूमिका घेतली आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी नवे आदेश जारी केले असून, मुदतबाह्य किंवा खराब झालेला माल प्रत्यक्ष नष्ट केल्याचा ठोस पुरावा सादर करणे कंपन्यांना बंधनकारक करण्यात आले आहे. ▶▶ पान २ वर



पॅकिंगवर एक्सपायरी डेट घालावी लागणार!

दिवाळी हा खाद्यपदार्थांचा सण आहे आणि या काळात ग्राहकांच्या हिताला प्रथम प्राधान्य दिले जाईल असे एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. दिवाळीत एक्पायरी झालेला माल विकला जाऊ नये यासाठी कारवाई सुरु झाल्या आहेत असे त्यांनी सांगितले. तसेच प्रत्येक खाद्यपदार्थाच्या पॅकिंगवर एक्पायरी डेट कंपल्सरी घालावी लागणार आहे, असेही मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. दिवाळीत कालबाह्य पदार्थ विकल्यास कठोर कारवाई केली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. योग्य तेलाचा वापर करणे तसेच भेसळयुक्त कोणताही पदार्थ तयार करु नये असा इशाराही तुकाराम मुढें यांनी व्यावसायीकांना दिला आहे.

२८,७५३ क्विंटल खाद्यतेल जप्त; ८० खाद्य व्यवसाय परवाने निलंबित

राज्यात भेसळ आणि निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांच्या विक्रीविरुद्ध राबवलेल्या सात महिन्यांच्या मोहिमेदरम्यान १८.९५ कोटी रुपये किमतीचे २८,७५३ क्विंटल खाद्यतेल एफडीएने जप्त केले असून, ८० खाद्य व्यवसाय परवाने निलंबित केले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. १ एप्रिल ते २९ ऑक्टोबर या कालावधीत राज्यभरात १,०८९ ठिकाणी तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कालावधीत १८.९४ कोटी रुपये मूल्याचे २८,७५३.३० क्विंटल खाद्यतेल जप्त करण्यात आले. तसेच, विभागाने प्रयोगशाळेत तपासणीसाठी १,६६० नमुने गोळा केले आहेत. विभागाने आपल्या सात विभागांतर्गत एकूण ८० खाद्य व्यवसाय परवाने निलंबित केले आहेत.



टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणात एकाला अटक

मुंबई । प्रतिनिधी

अभिनेता टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरणाच्या तपासाला आता आर्थिक व्यवहारांच्या दिशेने महत्त्वपूर्ण वळण मिळाले आहे. मुंबई गुन्हे शाखेच्या तपासात गोळीबाराची सुपारी देण्यासाठी वापरण्यात आलेल्या पैशांच्या व्यवहारांचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले आहेत. हरियाणातील आरोपी अमन याच्या बँक खात्यात सुपारीची रक्कम जमा करण्यात आल्याचे उघड झाल्यानंतर गुन्हे शाखेने त्याला अटक केली आहे. या कारवाईमुळे प्रकरणातील अटक आरोपींची संख्या १२ वर पोहोचली आहे. अमन हा हरियाणातील रोहाना गावचा रहिवासी ▶▶ पान २ वर


२०२९ मध्येही मोदींच्याच नेतृत्वाखाली लोकसभा निवडणूक!

अमित शाह यांची घोषणा; भाजपची नेतृत्वाबाबत भूमिका स्पष्ट

लखनौ । वृत्तसंस्था

२०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आतापासूनच नेतृत्वाबाबतची भूमिका स्पष्ट करण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम देत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२९ ची लोकसभा निवडणूकही मोदी यांच्याच नेतृत्वाखाली लढविण्यात येणार असल्याचे जाहीर केले. मोदी हेच सलग चौथ्यांदा पंतप्रधान होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

लखनौ येथे उत्तर प्रदेश भाजपच्या नवनिर्वाचित प्रदेश कार्यसमितीच्या पहिल्या बैठकीत अमित शाह यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. यावेळी २०२९ च्या निवडणुकीतील नेतृत्वाचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी भाजपमध्ये नेतृत्व बदलाबाबत कोणताही संभ्रम नसल्याचे स्पष्ट केले. काही राजकीय घटकांकडून नेतृत्वाबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, भाजप आगामी लोकसभा निवडणूक नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालीच लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वयावरून आणि राजकीय निवृत्तीच्या चर्चांवरून विरोधकांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या मुद्द्यांनाही शाह यांनी प्रत्युत्तर दिले. देशातील जनतेचा मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास असल्याचे सांगत, कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या जोरावर भाजप २०२९ मध्येही विजय मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या बैठकीला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, प्रदेशाध्यक्ष पंकज चौधरी, उपमुख्यमंत्री केशव ▶▶ पान २ वर




उद्धव ठाकरे नाहीतर आदित्य जेलमध्ये जाणार-नितेश राणे

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या हितासाठी एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे एकत्र येऊ शकतात असे वक्तव्य शिवसेना (शिंदे गट) नेते रवींद्र धंगेकर यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. याबाबत मंत्री नितेश राणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमच्या वरिष्ठांनी नोंद घेतली असून, ते निर्णय घेणार आहेत, आम्ही त्याची वाट पाहू असे मत त्यांनी व्यक्त केले. एप्रिल, मे मध्ये उद्धव ठाकरे किंवा आदित्य ठाकरे हे जेलमध्ये असतील असा दावा नितेश राणे यांनी केला.

आमचे नरेंद्र मोदींचे सरकार अजून भक्कम होणार आहे. कारण, २०२९ ला मोठ्या मतांनी आणि मोठ्या ताकदीने निवडून येईल. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मजबूत होत चालले आहे. संजय राऊत यांची आतापर्यंत कुठली भाकित खरी ठरलेली नाहीत. कदाचित स्वतःच्या मालकाची तारीख एप्रिल



महिन्यात ठरवली असेल असा टोला देखील नितेश राणेंनी राऊतांना लगावला. मुंबईच्या समुद्रकिनारी असली होल्डिंगमध्ये चार स्पॉट असणार आहेत २० नाही. २० ठिकाणी समुद्रात सगळीकडे होल्डिंग दिसणार असा अपप्रचार केला जात आहे. मुंबईला पर्यटनाच्या आणि विकासाच्या दृष्टिकोनातून आमचे सरकार सज्ज आहे. मी पण मुंबईकर असल्यामुळे माझ्या मुंबईला मी कुठे गालबोट लावायला देणार नाही. आमचे सरकार कुठेही पर्यावरणाला हानी पोहोचवणार नाही असे राणे म्हणाले. उद्धव ठाकरे फोटोग्राफी करत राहिले असते तर खूप गोष्टी टाळल्या असत्या, हिंदूहृदयसम्राट ▶▶ पान २ वर

तारीख बदला: आघाडीच्या रॅलीला व्यापाऱ्यांचा विरोध नाही

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर रोजी नियोजित इंडिया आघाडीच्या रॅलीवरून दिल्लीतील व्यापाऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे. दिवाळीचा महत्त्वाचा व्यापार हंगाम सुरू असताना ही रॅली आयोजित केल्याने बाजारपेठेतील व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे सांगत दिल्लीच्या चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने (सीटीआय) काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांना पत्र लिहिले आहे. रॅलीची तारीख १० किंवा ११ नोव्हेंबरनंतर ठेवावी अथवा रॅलीचे ठिकाण रामलीला मैदानाऐवजी बुराडी मैदानावर हलवावे, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

सीटीआयचे अध्यक्ष ब्रिजेश गोयल आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी पाठवलेल्या या पत्रात व्यापाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्याही राजकीय



पक्षाच्या किंवा आंदोलन करण्याच्या अधिकाराच्या विरोधात आपली भूमिका नसून, दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणाच्या काळात व्यापारी, त्यांचे कुटुंबीय आणि कामगार यांच्या उपजीविकेवर परिणाम होऊ नये, एवढीच आपली अपेक्षा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी व्यापाऱ्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याकडेही रॅलीची तारीख बदलण्याची विनंती केली होती. ▶▶ पान २ वर

'ई केवायसी' न झालेल्या लाडक्या बहिणींनाही १५०० रुपये मिळणार?

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेविषयी महत्वाची माहिती राज्यातील ८१ लाख लाडक्या बहिणींना दिवाळी गिफ्ट मिळू शकते. काही कारणास्तव त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. यामध्ये आदिवासी आणि गरीब कुटुंबातील महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. या महिलांना लवकरच १५०० रुपयांचा सन्माननिधी मिळू शकतो. या महिलांना १५०० रुपयांचा हप्ता मिळवून देण्याची हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर कष्टकरी, शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना फडणवीस यांनी हे आश्वासन दिल्याची माहिती समोर येत आहे. अखिल भारतीय किसान सभेने कष्टकरी, शेतकरी यांचा न्याय मागण्यासाठी मोर्चा काढला.



हा मोर्चा मुंबईकडे निघाला असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोर्चेकऱ्यांच्या शिष्टमंडळाला भेटीस बोलावले होते. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहावर शिष्टमंडळासोबत साधकबाधक चर्चा झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पाच महत्त्वाच्या खात्याचे मंत्री हजर होते. तसेच विविध विभागाचे सचिवही उपस्थित होते. शेतक–यांच्या अडीअडचणीसोबतच किसान सभेने लाडक्या बहिणींचा मुद्दा उपस्थित केला. राज्यातील अनेक महिलांना ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करता न आल्याचा मुद्दा हिरारीने मांडला. तांत्रिक अडचणी समोर आणल्या. शिष्टमंडळाशी चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांनी ई–केवायसी रखडलेल्या, प्रलंबित महिलांना दिलासा दिला. कागदपत्रांची पूर्तता केली नाही अथवा ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही अशा सर्व पात्र महिलांच्या बँका खात्यात पैसे जमा करण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. जवळपास ८१ लाख महिलांची तांत्रिक अडचण दूर करण्यात येईल अशी हमी मुख्यमंत्र्यांनी दिली. यामुळे या महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रशासनाला तातडीने याप्रकरणी अंमलबजावणीचे निर्देशही देण्यात ▶▶ पान २ वर

अग्रलेख

शून्याचा सोयीस्कर जल्लोष आणि वास्तवाचे विस्मरण!

विधान परिषदेच्या निवडणुका म्हणजे मतदारांची मर्यादित संख्या आणि मोजकेच मतदारसंघ. परंतु, या निवडणुकांना भाजपने दिलेले महत्त्व पाहता, जणू काही देशाचे भवितव्य याच निवडणुकांवर अवलंबून आहे, असा आव आणला जातो. प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना, विशेषतः काँग्रेसला चितपट करण्याचा विडा उचलायचा आणि निकालानंतर आपल्या विजयाचा मोठा गाजावाजा करायचा, हा शिरस्ता बनला आहे. मात्र, या राजकीय आतषबाजीत भाजपच्या पदरी आलेले अपयश आणि विरोधकांनी दिलेले धक्के कसे सोयीस्करपणे झाकले जातात, याचे उत्तम दर्शन अलीकडील विधान परिषद निकालांनी घडवले आहे.

उत्तर प्रदेशात विधान परिषदेच्या ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपला ६, तर समाजवादी पक्षाला ५ जागा मिळाल्या. काँग्रेसच्या वाट्याला एकही जागा आली नाही, हे सत्य आहे. पण या निकालाचा एकमेव अर्थ 'काँग्रेसचा पराभव' असाच काढायचा का? समाजवादी पक्षाने तब्बल ५ जागा जिंकत सत्ताधारी पक्षाला दिलेली कडवी टक्कर आणि खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी लोकसभा मतदारसंघात भाजपलाच झालेला पराभव, या वास्तवाकडे डोळेझाक कशी चालणार? भाजपच्या ६ जागांचा जल्लोष मोठा की समाजवादी पक्षाचा हा जोरदार धक्का, याचे आत्मपरीक्षण विरोधकांसोबतच सत्ताधाऱ्यांनीही करायला हवे. बिहारमधील आठ जागांच्या निवडणुकीत भाजपला केवळ तीन जागांवर समाधान मानावे लागले, तर उर्वरित जागांवर इतरांनी बाजी मारली. कर्नाटकात चारपैकी तीन जागा भाजपने जिंकल्या आणि एक जागा जेडीएसच्या वाट्याला आली, तर काँग्रेसला पुन्हा रिकाम्या हाती राहावे लागले. काँग्रेससाठी हा नक्कीच चिंतेचा विषय आहे; परंतु भाजपनेही या निकालांकडे केवळ काँग्रेसच्या अपयशाच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी बदलत्या राजकीय समीकरणांचे आकलन करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात तर निकालाचे चित्र सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षण करायला लावणारे आहे. विधान परिषदेच्या पाच जागांपैकी महाविकास आघाडीने तीन जागांवर आपला झेंडा फडकवला, तर सत्ताधाऱ्यांना केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागा जिंकून आपली ताकद पुन्हा सिद्ध केली. यातही सर्वांत लक्षवेधी ठरला तो नागपूरचा निकाल! उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्य ठिकाण असलेल्या नागपूरमध्ये काँग्रेसने मिळवलेला विजय हा भाजपसाठी केवळ एका जागेचा पराभव नाही, तर तो त्यांच्या बालेकिल्ल्यात विरोधकांनी दिलेला अत्यंत गंभीर राजकीय इशारा आहे. थोडक्यात सांगायचे तर, काँग्रेसला शून्य जागा मिळाल्या म्हणून जल्लोष साजरा करताना वाराणसीतला पराभव, नागपुरातील धक्का, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाची मुसंडी आणि महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे बहुमत याकडे दुर्लक्ष करणे हा विजयाचा उत्सव नव्हे, तर निवडक आकडे पुढे करून राजकीय वास्तव झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न ठरतो. लोकशाहीत प्रत्येक निकालाचा अन्वय अर्थ लावला जातो, पण तो आपल्या सोयीनुसार बदलता येत नाही. काँग्रेसचा पराभव हा पराभवच आहे, यात दुमत असण्याचे कारण नाही; मात्र भाजपला जिथे जिथे धक्के बसले आहेत, तेही प्रामाणिकपणे स्वीकारावेच लागतील. निवडणुकीत विरोधक हरले की तो जनतेचा कौल आणि भाजप हरला की 'स्थानिक समीकरणे', असा दुहेरी न्याय लोकशाहीत चालत नाही. म्हणूनच, या निवडणुकांचे निकाल केवळ काँग्रेसच्या 'शून्यापुरते' मर्यादित नाहीत. भाजपच्या दाव्यांमधील मर्यादा, विरोधकांची टिकून असलेली ताकद आणि नागपूरसारख्या गडात झालेला पराभव या वास्तवांना सामोरे जाणे आवश्यक आहे. काँग्रेसच्या शून्यावर हसणाऱ्यांनी हे विसरता कामा नये की, राजकारणात दुसऱ्याच्या शून्यावर ताशेरे ओढताना स्वतःच्या आकड्यांची बेरीज आणि वजाबाकी कधी चुकते, हे वेळेवरच लक्षात घेतलेले बरे!



मायक्रो फायनान्स कंपन्याना लगाम लावा

जालना । प्रतिनिधी

मायक्रो फायनान्स कंपनीला लगाम लावा नसता मनसे स्टाईल धडा शिकवू असा आज रोखठोक इशारा देण्यात आला आहे याबाबत आज जालना जिल्हाधिकारी याना निवेदन देऊन जालना बदनापूर व भोकरदन तालुक्यातील महिला सह जिल्हाधिकाऱ्यां सोबत चर्चा केली व जिल्ह्यातील सर्व मायक्रो प्रायवेट फायनान्स कंपनी ला सक्त ताकीत देऊन वसुली थांबवा अन्यथा त्या कंपन्याना मनसे स्टाईल धडा शिकवू या वेळी गजानन गिते मनसे जिल्हाध्यक्ष कृष्णा खलसे तालुका अध्यक्ष उपाध्यक्ष रोहित व्यवहारे मनोहर इंगळे सुरेश म्हस्के सुनील खरात सुरेखा म्हस्के नजमा सय्यद मनीषा म्हस्के सारिका लाखे वंदना म्हस्के कामिना म्हस्के उपस्थित होते

दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांकडून चार धारदार तलवारी जप्त; अल्पवयीन बालकांविरुद्ध कारवाई

जालना । प्रतिनिधी

मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंह संधु व मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांचे सूचनांप्रमाणे जालना शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन चंदनझिरा पोलिसांनी केलेल्या कारवाईत दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांकडून एकूण चार धारदार तलवारी जप्त केल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या तलवारींची अंदाजे किंमत १०,००० रुपये आहे.

दि. २९/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन चंदनझिरा येथे पोलीस कर्मचारी दैनंदिन कामकाज करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन इसम पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये धारदार तलवारी घेऊन इंद्रायणी चौक, चंदनझिरा येथून महात्मा फुले चौकाच्या दिशेने जात आहेत. सदर माहिती पोलीस निरीक्षक श्री. किरण बिडवे यांना कळविण्यात आल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने दोन पंचांसह तात्काळ महात्मा फुले चौक, चंदनझिरा येथे सापळा रचला. दरम्यान, सायंकाळी १८.३० वाजण्याच्या सुमारास दोन इसम हातात पांढऱ्या रंगाची गोणी घेऊन येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलीस पथकाने तत्परतेने दोघांना गोणीसह ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता ते दोघेही अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले.



त्यांच्याकडील गोणीची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्यामध्ये १० हजार रुपये किंमतीच्या तीन लोखंडी धातूच्या धारदार तलवारी व एक स्टील धातूची धारदार तलवार अशा एकुण ०४ धारदार तलवारी मिळून आल्याने जप्त करण्यात आल्या आहेत. याप्रकरणी पोलीस स्टेशन चंदनझिरा येथे संबंधित दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. विशेष बाब म्हणजे सदर कारवाईतील दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांविरुद्ध यापूर्वीही पोलीस स्टेशन चंदनझिरा येथे खुनाच्या गुन्ह्याची नोंद झालेली असल्याची बाब तपासात समोर आली आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे होणारा कल ही चिंतेची बाब असून, पालकांनी आपल्या पाल्यांच्या वर्तनाकडे, मित्रपरिवाराकडे व हालचालींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आजच्या काळात अल्पवयीन मुलांच्या हातात मोबाईल, इंटरनेट व सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध प्रकारची माहिती सहज उपलब्ध होत आहे. काही वेळा चित्रपट, वेब सिरीज, सोशल मीडिया तसेच चुकीच्या संगतीचा प्रभाव पडून अल्पवयीन मुले धारदार शस्त्रे बाळगणे, त्यांचे प्रदर्शन करणे किंवा अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांकडे आकर्षित होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक श्री. किरण बिडवे यांनी पालकांना आवाहन केले आहे की, आपल्या पाल्यांच्या मित्रपरिवारावर, त्यांच्या दैनंदिन हालचालींवर, मोबाईल व सोशल मीडियावरील वापरावर तसेच त्यांच्या वर्तनातील बदलांवर पालकांनी विशेष लक्ष ठेवावे. पाल्यांकडे अचानक धारदार शस्त्रे किंवा संशयास्पद वस्तू अल्पवयीन मुलांचे भविष्य घडविण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची नसून पालक, शिक्षक आणि समाजातील प्रत्येक घटकाची आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, सफौ मनसुब वेताळ, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, राजेंद्र पवार, अभिजीत वायकोस, शिवाजी जमधडे यांच्या पथकाने केली आहे.

आकांक्षीत तालुका व जिल्हा कार्यक्रमांतर्गत आकांक्षा हाट 'वोकल फॉर लोकल' कार्यक्रमाचे नियोजन विषयक बैठक

बीड । प्रतिनिधी

नीती आयोग, भारत सरकार यांच्या आकांक्षी जिल्हे व तालुका कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद, बीड येथे दि. ४ व ५ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषद प्रांगणात 'आकांक्षा हाट – वोकल फॉर लोकल' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद येथे आढावा बैठक नुकतीच पार पडली.



आकांक्षी जिल्हा कार्यक्रमांतर्गत विकास निर्देशांकात सुधारणा करणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच स्थानिक उत्पादने आणि लाभार्थींना प्रोत्साहन देणे या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून 'आकांक्षा हाट' आयोजित करण्यात येत आहे. या प्रदर्शनात महिला बचत गट, कृषी विभागामार्फत स्थापन शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ/एफपीसी) तसेच महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत कार्यरत गटांच्या उत्पादनांची विक्री करण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. याशिवाय दुष्काळ व पाणीटंचाई या विषयांवर पशुसंवर्धन विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (ठडएढख) तसेच विविध स्वयंसेवी संस्थांकडून माहितीपर प्रदर्शने व प्रात्यक्षिके आयोजित केली जाणार आहेत. मृदा व जलसंधारण, सेंद्रिय शेती, रेशीम शेती, तसेच दुष्काळी परिस्थितीत फळबाग व्यवस्थापन आदी विषयांवरील चर्चासत्रेही होणार आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महिला बचत गटांमार्फत तयार करण्यात आलेले दिवाळी फराळ, सजावटीच्या वस्तू आणि अन्य स्थानिक उत्पादने नागरिकांना खरेदीसाठी उपलब्ध असणार आहेत. या उपक्रमात अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केले आहे. सदरील बैठीसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक, कृषि, पशुसंवर्धन, रेशीम विकास, आरोग्य, महिला व बालकल्याण, मृदा व जलसंधारण, इतर संबंधित विभागांची उपस्थिती होती. अशोक बाराखोते-गटविकास अधिकारी, पंचायत समिती-वडवणी यांनी आकांक्षीत तालुक्याच्यावतीने सर्व यंत्रणा व सर्व सामान्य जनतेने आकांक्षा हाट मध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले आहे.

आरटीइ प्रवेशासाठी भाऊसाहेब घुगे यांचा पुढाकार

शिक्षणमंत्र्यांकडून प्रवेश देण्यासाठी गटशिक्षण अधिकाऱ्यांना निर्देश

जालना । प्रतिनिधी

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा हक्क अधिनियमांतर्गत (२५%) नामांकित शाळांमध्ये मोफत प्रवेश मिळावा, यासाठी शिवसेनेचे जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे या प्रश्नाला प्रशासकीय स्तरावर गती मिळाली आहे.

बदनापूर येथील ट्विंकल स्टार (जंबो किड्स) शाळेत अंतर्गत प्रवेश न मिळाल्याने कु. पूर्वा राहुल जाधव या विद्यार्थिनीच्या प्रवेशासाठी तिची आई सौ. रुपाली राहुल जाधव व आजी सौ. ताराबाई रामराव जाधव यांनी २६ ऑक्टोबरपासून गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती बदनापूर कार्यालयासमोर शांततापूर्ण उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी स्वतः उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलक पालकांची भेट घेतली, त्यांची व्यथा जाणून घेतली आणि विद्यार्थिनीला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी थेट शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली व विद्यार्थिनीला अंतर्गत प्रवेश मिळवून देण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली. भाऊसाहेब घुगे यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत २९ ऑक्टोबर रोजी शिक्षणमंत्री दादाजी भुसे



यांनी संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती बदनापूर यांनी २९ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद जालना येथील प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवून पुढील कार्यवाहीची विनंती केली आहे. संबंधित शाळेत अंतर्गत मंजूर ८ पैकी ८ जागा भरलेल्या असल्या, तरी त्यापैकी ३ विद्यार्थी प्रत्यक्षात शाळेत उपस्थित नसल्याचे तसेच वारंवार संपर्क करूनही ते शाळेत हजर झाले नसल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या ३ जागा रिक्त करून प्रतीक्षा यादीतील पुढील ३ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यासाठी वरिष्ठ स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना व तहसीलदार बदनापूर यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत. उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट, पालकांची बाजू समजून घेणे, शिक्षणमंत्र्यांशी थेट संवाद आणि प्रशासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा अशा पातळ्यांवर भाऊसाहेब घुगे यांनी सक्रिय भूमिका बजावली. विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क अबाधित राहिला पाहिजे आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होता कामा नये, अशी ठाम भूमिका त्यांनी यावेळी मांडली. यावेळी गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके, शिवसेना पदाधिकारी नंदुभाऊ दाभाडे, शिवसेना दलित आघाडी तालुकाप्रमुख हिवराळे नेते, परमेश्वर गरबडे, देवा ढाकणे, राहुल जाधव, डॉ. होर्शील, प्रल्हाद भडांगे व सर्जेराव वाघ आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून न्याय मिळवून देण्यासाठी भाऊसाहेब घुगे यांचा ठाम पुढाकार

पान १ वरून...

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाला

आणि बुरशीमुक्त असणे आवश्यक आहे. त्यामधील ओलावा ६२ ते ७० टक्के, पीएच ३.५ ते ४.४ आणि क्रूड प्रोटीन किमान ७ टक्के असावे. अन्य घटकांसाठी भारतीय मानक ब्युरोच्या आयएस १९५६२ : २०२६ मधील निकष लागू राहतील.

टायगर श्रॉफ गोळीबार

आहे. सुपारीचे पैसे थेट त्याच्या बँक खात्यात जमा झाल्याची विश्वसनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने खरखोडा येथे सापळा रचून अमनला ताब्यात घेतले. तपासात रोहाना येथील दुसरा आरोपी कुणाल संजय याने अमनच्या बँक खात्यात सुपारीची रक्कम जमा केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या दोघांमधील आर्थिक व्यवहारांचा आणि गोळीबाराच्या कटातील त्यांच्या भूमिकेचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणात केवळ एका खात्यातूनच नव्हे, तर अन्य अनेक बँक खात्यांमधूनही आर्थिक व्यवहार झाल्याचे तपासात उघड झाले आहे. विविध खात्यांमधून प्रत्येकी पाच हजार रुपयांच्या रकमा हस्तांतरित करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. गोळीबाराची घटना घडवून आणण्यासाठी लागणारी सुपारीची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात आली असावी, असा पोलिसांचा संशय आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेने संबंधित बँक खात्यांची माहिती, पैशांचे हस्तांतरण, रक्कम जमा करणारे आणि ती स्वीकारणारे व्यक्ती यांची साखळी जोडण्यास सुरुवात केली आहे. या आर्थिक व्यवहारांमागे आणखी कोणाचा सहभाग आहे, सुपारीची रक्कम नेमकी कोठून आली आणि गोळीबाराच्या कटासाठी पैशांचे नियोजन कोणी केले, याचा शोध घेतला जात आहे. त्यामुळे या प्रकरणातील आर्थिक जाळे उघडकीस येण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, या प्रकरणातील उर्वरित ११ अटक आरोपींना विशेष मकोका न्यायालयाने ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अर्थात मकोका लागू झाल्यानंतर या प्रकरणातील ही पहिलीच रिमांड सुनावणी ठरली. त्यामुळे आरोपींची भूमिका, आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे आणि गोळीबाराच्या कटामागील संपूर्ण यंत्रणा उघड करण्यासाठी पोलिसांना आता अधिक वेळ मिळाला आहे.

मुदत संपलेले अन्नपदार्थ पुन्हा

केवळ कागदोपत्री माल नष्ट केल्याचे प्रमाणपत्र दाखवून जबाबदारी झटकता येणार नसल्याचे या आदेशातून स्पष्ट करण्यात आले आहे. अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेशी तडजोड करणाऱ्या कंपन्या आणि व्यावसायिकांवर आता प्रशासनाची करडी नजर राहणार आहे. काही ठिकाणी एक्सपायरी झालेल्या अन्नपदार्थांची तारीख बदलून ते पुन्हा विक्रीसाठी बाजारात आणले जात असल्याचे, तर काही कंपन्या दलालांच्या माध्यमातून माल नष्ट केल्याची बनावट प्रमाणपत्रे मिळवून प्रत्यक्षात तोच माल पुन्हा विक्रीसाठी पाठवत असल्याचे एफडीएच्या तपासात समोर आले होते. या गंभीर प्रकारांची दखल घेत प्रशासनाने नियमांच्या अंमलबजावणीसाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. अन्नपदार्थांची गुणवत्ता आणि ग्राहकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हॉटेल्स, दूध व दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, शाळांमधील खाद्यान्न अशा विविध क्षेत्रांचा समावेश असलेली २२ मुद्द्यांची नियमावली लागू करण्यात आली आहे. प्रशासनाचा उद्देश केवळ छापे टाकून कारवाई करणे नसून, संबंधित आस्थापनांकडून नियमांचे काटेकोर पालन करून घेणे हा असल्याचे आयुक्त मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, गेल्या १५ दिवसांत एफडीएने भिवंडी आणि वडपे परिसरात मोठ्या प्रमाणावर धडक कारवाई केली. भिवंडीत सुरुवातीला ८० हजार रुपयांचा, तर त्यानंतर तब्बल २६ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. वडपे परिसरातील दोन आस्थापनांचे परवानेही निलंबित करण्यात आले आहेत. या संपूर्ण कारवाईत सुमारे पाच कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून, दहा कारवायांच्या अनुषंगाने दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणांमध्ये मालकांसह एकूण ३२ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. एफडीएने गेल्या दोन महिन्यांपासून केलेल्या सखोल तपासणीनंतर हा नवा आदेश जारी केला आहे. त्यामुळे मुदतबाह्य आणि खराब अन्नपदार्थांच्या विल्हेवाटीबाबत कंपन्यांना अधिक जबाबदारीने काम करावे लागणार आहे. माल नष्ट केल्याचा बनावट पुरावा देऊन पुन्हा तोच माल ग्राहकांच्या माथी मारण्याचे प्रकार रोखण्याबरोबरच अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा प्रशासनाचा इशारा या निर्णयातून देण्यात आला आहे.

उद्धव ठाकरे नाहीतर आदित्य

बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला गालबोट लागले नसते, असा टोला देखील नितेश राणेंनी लगावला. मुख्यमंत्र्यांनी दिलेला सल्ला दोन्ही ठाकरे बंधूंनी ऐकावा. जेणेकरून त्यांचे भविष्य उज्वल होईल असेही राणे म्हणाले. दरम्यान, राज ठाकरेंना आम्ही कधीच नाराज केलेले नाही, पुढेही नाराज करणार नाही. २०२९ पर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री राहतील. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचा अभिमान आणि स्वाभिमान आहेत असे नितेश राणे म्हणाले.

२०२९ मध्येही मोदींच्याच नेतृत्वाखाली

प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक यांच्यासह राज्यातील सुमारे दोन हजार ८५० प्रमुख नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, २०२७ मध्ये होणाऱ्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही अमित शाह यांनी पक्षाची भूमिका मांडली. उत्तर प्रदेशात भाजप पुन्हा सत्तेत आल्यास राज्यात समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली. यापूर्वी अनेक राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू झाल्याचा उल्लेख करत उत्तर प्रदेशातही त्याची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यावरही शाह यांनी टीका केली. उत्तर प्रदेशात भाजपने पुन्हा सत्ता मिळविण्याचा विश्वास व्यक्त करत आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी संघटनात्मक पातळीवर तयारीला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. लोकसभा निवडणुकीला अद्याप बराच कालावधी असताना भाजपने उत्तर प्रदेशातील संघटनात्मक बांधणी आणि आगामी विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे. या बैठकीतून पक्षाच्या आगामी राजकीय रणनीतीचे संकेत मिळाले आहेत.

'ई केवायसी' न झालेल्या लाडक्या

आल्याची माहिती समोर येत आहे. 'ई केवायसी' अभावी आर्थिक लाभापासून वंचित ८१ लाख लाडक्या बहिणींना पुन्हा योजनेत समावून घेण्यात येणार आहे. केवायसी प्रक्रिया सुरू ठेवण्यात येणार आहे. सध्या बंद असलेले पोर्टल पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. ज्या लाडक्या बहिणींची केवायसी प्रक्रिया झालेली नाही. अथवा ज्यांची केवायसी प्रक्रिया होऊनही त्यांना सन्माननिधी मिळत नसेल. त्यांना तो लगेच मिळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळणार आहे.

तारीख बदला: आघाडीच्या

मात्र, राहुल गांधी यांनी ही मागणी फेटाळल्याने व्यापाऱ्यांनी आता सोनिया गांधी यांच्याकडे आशेने पाहिले आहे. 'सोनियाजी, तुम्ही नेहमीच छोटे व्यापारी आणि कामगारांच्या समस्या समजून घेतल्या आहेत. राहुल गांधी यांच्याकडे आम्ही रॅलीची तारीख बदलण्याची विनंती केली होती; मात्र त्यांनी नकार दिला. आता तुम्ही आमची अडचण समजून घ्याल, हीच अपेक्षा आहे,' अशा शब्दांत व्यापाऱ्यांनी पत्रातून साकडे घातले आहे. दिवाळी आणि धनत्रयोदशीच्या काळात बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होते. अशा वेळी रामलीला मैदान परिसरातील वाहतूक, गर्दी आणि रॅलीमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य अडथळ्यांचा व्यापारावर परिणाम होऊ शकतो, अशी व्यापाऱ्यांची चिंता आहे. त्यामुळे राजकीय कार्यक्रमाला विरोध न करता त्याची तारीख किंवा जागा बदलून व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता सोनिया गांधी यांच्याकडे करण्यात आली आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ३१ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात



पुण्यस्मरणाचा खर्च ज्ञानदानासाठी
डोमरी केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांना दिवाळी अभ्यास पुस्तिकांची भेट

बीड । प्रतिनिधी

कै.शिवानी नारायण भोंडवे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त पुण्यस्मरणातील इतर कार्यक्रमांना फाटा देत विद्यार्थ्यांच्या ज्ञानदानासाठी आदर्श उपक्रम आज डोमरी येथे पार पडला. कै.शिवाजी भोंडवे यांच्या पत्नी तथा जि.प.प्रा.शाळा, तिरमलवाडीच्या मुख्याध्यापिका श्रीमती खोसे मॅडम यांच्या पुढाकारातून डोमरी केंद्रातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना दिवाळी अभ्यास पुस्तिकांचे वाटप करण्यात आले.

पतीच्या पुण्यस्मरणानिमित्त अनावश्यक कार्यक्रमांवर खर्च करण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपयोगासाठी हा खर्च करण्याचा आदर्श निर्णय श्रीमती खोसे यांनी घेतला. या उपक्रमामुळे पुण्यस्मरणाच्या पारंपरिक स्वरूपाला शैक्षणिक उपक्रमाची जोड मिळाली. दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरू राहावा म्हणून डोमरी केंद्रातील विद्यार्थ्यांना दिवाळी अभ्यास पुस्तिकांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. पुण्यस्मरणाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी योगदान देण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला. या उपक्रमामुळे डोमरी केंद्रातील विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत अभ्यासासाठी पुस्तिकांचा उपयोग होणार आहे. पुण्यस्मरणातून ज्ञानदानाचा विचार प्रत्यक्षात आणणारा हा उपक्रम शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक योगदान म्हणून पाहिला जात आहे. या उपक्रमासाठी त्यांना केंद्रप्रमुख श्रीमती मनीषा पोटभरे, दिलीप खाडे,अशोक बांगर, बाबासाहेब सानप, भागवत बांगर,पांडुरंग कचरे, लहुकांत कोल्हे,जीवन पुरी,रवींद्र कळसाने,सुरेंद्र गोल्हार, बाबा आडले यांचे विशेष सहकार्य लाभले.

अहिल्यानगर जिल्हा बँक संचालकपदी आ.राजळे-घुले

पिंपळवंडी । प्रतिनिधी

महाराष्ट्रात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रगतीवर आहे.या बँकेच्या निवडणुकीत मा.कृषीमंत्री बाळासाहेब थोरात,ना.राधाकृष्ण विखे,राम शिंदे व जिवलग कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून १० संचालक बिनविरोध निवडून आले आहेत. बँकेच्या सेवा संस्था गटातून कार्यशील आ.मोनिका राजळे,सौ.राजश्री चंद्रशेखर घुले,शंकरराव गडाख,डॉ.विवेक कोल्हे, डॉ.सुजय विखे,रणजीत देशमुख,करण ससाने,दत्तात्रय पानसरे,सचिन घुमरे,अक्षय कर्डिले यांची तर बिगरशेती संस्थेतून सचिन जगताप या ११ संचालकांची निवड झाली आहे.आता १० संचालक पदासाठी दि.२ रोजी मतदान होत आहे.आघाडी शासन काळात बँकेचे थकीत कर्जदार सहकारी संस्था भाडेतत्त्वावर देऊन व विक्री करून या बँकेला फायदा झाला.परिणामी शेतकरी,बलुतेदार,कलावंत,कारागीर व युवकांचे जीवनमान सुधारण्यासाठी फायदा झाला.नुतन संचालक मोनिकाताई राजळे, यांचे युवा नेते धनंजय बडे,त्रिंबक शेळके वडगाव गावकऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



महंत कृष्णा महाराज शास्त्रींच्या स्वागताची निगमानंद संस्थानवर जय्यत तयारी

निगमानंद महाराज यांच्या ७ व्या पुण्यतिथी निमित्त कीर्तनसोहळा

शिरूर । प्रतिनिधी

श्री. क्षेत्र भगवान गडाचे मठाधिपती महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांनी आपले परम शिष्य हभप. कृष्णा महाराज शास्त्री यांची भगवान गडाचे चौथे मठाधिपती महंत म्हणून विजयादशमीच्या मुहूर्तावर नियुक्ती केली आणि त्यांना सन्मान पूर्वक गडाच्या गादीवरती विराजमान केले. महंत नामदेव शास्त्रींच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात स्वागतही करण्यात आले आहे . महंत कृष्णा महाराज यांची नियुक्ती झाल्यानंतर निगमानंद संस्थानच्या वतीने त्यांचा पहिल्यांदाच शनिवार दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी भव्य स्वरूपात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. व श्री श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाची मठाधिपती वै. महंत निगमानंद महाराज यांच्या सातव्या पुण्यतिथीनिमित्त निगमानंद संस्थान वरती महंत कृष्णा महाराज शास्त्री यांचे शनिवारी सायंकाळी ७ ते ९ या वेळेमध्ये किर्तनही आयोजित करण्यात आले आहे . गेल्या आठ-दहा महिन्यातच नव्याने उदयास आलेले निगमानंद संस्थान वरती भगवान गडाच्या नूतन महंताचा सत्कार समारंभ होत असल्याने या सोहळ्याला खास महत्व प्राप्त होत असल्याचे भाविकातून बोलले जात आहे. शनिवारी दुपारनंतर सुरू होणाऱ्या या सोहळ्याची निगमानंद संस्थान व नांदेवली माळयाचीवाडी या ग्रामस्थांकडून जोरदार तयारी चालली आहे. महंत कृष्णा महाराज यांच्या कीर्तनानंतर या ठिकाणी भाविक-भक्तांसाठी महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन ही करण्यात आले आहे. या सोहळ्याचा आनंद लुटण्यासाठी किंबहुना साक्षीदार होण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अवाहन निगमानंद संस्थानचे मठाधिपती महंत उद्धव महाराज शास्त्री यांच्यासह माळ्याचीवाडी, नांदेवली या दोन्ही गावच्या ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

सोहळ्याला भाविक भक्तांची गर्दी



दाटणार

श्री क्षेत्र भगवान गडाचे नूतन महंत गडाच्या गादीवरती विराजमान झाल्यानंतर पहिल्यांदाच निगमानंद संस्थांवरती कीर्तनाच्या माध्यमातून भाविक भक्तांशी संवाद साधणार आहेत. त्यातच निगमानंद संस्थान नवीन निर्मिती या दोन्हीची सांगड घालून कृष्णा महाराज काय बोलती याची उत्कंठा भाविक भक्तांना दाटून आली आहे. यामुळे या कीर्तन सोहळ्याला आणि सत्कार समारंभाला भगवान गडाच्या पायथ्याशी असलेल्या व निगमानंद संस्थानच्या परिसरातील भाविक भक्तांचा मोठी गर्दी लोटणार असल्याचे सांगितले जात आहे.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर ही उपस्थिती लावणार

महंत कृष्ण महाराज यांच्या सत्कार समारंभासाठी शिरूर कासार तालुक्यातील व परिसरातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची ही या कार्यक्रमाला उपस्थिती लाभणार बोलले जात आहे.

नांदेवली पासूनच होणार मिरवणूक सोहळा

नूतन महंत कृष्णा महाराज हे ब्रम्हनाथ येळंब मार्गे नांदेवली, निगमानंद संस्थांवरती येणार असल्याने ग्रामस्थांच्या वतीने नांदेवलीतील चौकातून महंत कृष्णा महाराजांची रथामध्ये बसवून भव्य स्वरूपात स्वागताची शोभायात्रा काढली जाणार आहे. यामध्ये टाळ मृदंग हंडेकरी झेंडेकरी, यांच्यासह डीजे पथक आदी वाद्यांचा समावेश होणार आहे. सायंकाळी साडेतीन ते चार वाजता निघणारा हा मिरवूणूक सोहळा सुमारे दोन किलोमीटर अंतरामध्ये पायी प्रवास करून निगमानंद संस्थान वरती पोहोचणार आहे. महाराजांच्या स्वागतासाठी फुले उधळण करण्यासाठी काही जेसीबी चे आयोजन ही करण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची भारत सरकारच्या I-STEM पोर्टलवर नोंदणी

संशोधन क्षेत्रात सोळंके महाविद्यालयाची झेप!वैज्ञानिक संशोधनाला मिळणार बळ

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची भारत सरकारच्या I-STEM या राष्ट्रीय डिजिटल उपक्रमांतर्गत नोंदणीकृत संस्था म्हणून नोंद झाली आहे. महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधनविषयक प्रगतीच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण यश मानले जात आहे.

भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या ख-डढएच् या राष्ट्रीय डिजिटल व्यासपीठाचा प्रमुख उद्देश देशातील संशोधन सुविधा अधिक सुलभतेने उपलब्ध करून देणे आणि वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहन देणे हा आहे. या पोर्टलच्या माध्यमातून देशातील विविध शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रयोगशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक उपकरणांची व संशोधन सुविधांची माहिती मिळते. त्यामुळे संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा लाभ घेण्याच्या संधी उपलब्ध होतात.

महाविद्यालयासाठी ख-डढएच् समन्वयक म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. एम. एस. वानखेडे यांची, तर प्रथम संपर्क अधिकारी म्हणून भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक ओ. एच. सारगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या नोंदणीमुळे महाविद्यालयाला संशोधनविषयक माहिती, वैज्ञानिक उपकरणे आणि तंत्रज्ञानाधारित संसाधनांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, तांत्रिक कौशल्यांना प्रोत्साहन देणे आणि संशोधन व नवोपक्रमांविषयी आवड निर्माण करणे यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरणार आहे. महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांना संशोधनाची जोड देण्याच्या दृष्टीनेही या नोंदणीला महत्त्व प्राप्त झाले आहे. प्राचार्य डॉ. अभय सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या नोंदणी प्रक्रियेत ख-डढएच् समन्वयक डॉ. एम. एस. वानखेडे आणि प्रथम संपर्क अधिकारी प्रा. ओ. एच. सारगे यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस सतीश चव्हाण तसेच महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य ड. बी. आर. डक यांनी अभिनंदन केले आहे.

पान ६ वरुन...

बिंदूसरेचा काठ विस्तारणार

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा राष्ट्रवादी कार्यालय प्रमुख भागवत तावरे होते. सदरील मार्गनिका संत सावता महाराज मंदिर ते संत ज्ञानेश्वर महाराजांचे आजोबा ब्र .गोविंदपंत यांच्या समाधी पर्यंत चा दक्षिण उत्तर रस्ता विस्तारला जात आहे . यामुळे संत मुक्ताई मार्गाकडील रहदारीला पर्यायी रस्ता दिला जाईल . थेट मोंढा रोड ला जोडला जाणारा रस्ता विस्तारला गेल्याने जड वाहने इथून जाऊ शकतात यामुळे मोठा लाभ रहदारी समस्या सोडवण्यात होणार आहे.

शासकीय कार्यालये, शाळा परिसरात

कार्यालयातील सभागृहात अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, यांच्यासह शिक्षण, आरोग्य, अन्न व औषध प्रशासन, पोलिस आदि विभागाचे संबंधित अधिकारी प्रमुख उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन म्हणाले की, सरकारी कार्यालयांची स्वच्छता आणि तंबाखूमुक्ती ही मोहिम आरोग्य विभागापासून सुरू होऊन संपूर्ण जिल्ह्यात राबविली गेली पाहिजे. शाळकरी मुले व्यसनाधीनतेकडे झुकू नयेत, यासाठी शाळा परिसर तंबाखूमुक्त ठेवणे बंधनकारक आहे. या मोहिमेत हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला. शाळेत व्यसनमुक्तीविषयक जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात यावेत. असे सांगून सर्व संबंधित विभागांनी समन्वय ठेवून अंमली पदार्थ विरोधी मोहीम जिल्ह्यात अधिक प्रभावीपणे राबवावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. तसेच कृषी, वने, शिक्षण, आरोग्य, अन्न व औषध प्रशासन, पोलिस विभागाने अंमली पदार्थ विरोधी जिल्ह्यात राबविलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावाही घेण्यात आला.

युवासेनेचा रॅपिडोला दणका!

परिवहन कार्यालय, बीड यांनी आज, दि. ३० ऑक्टोबर रोजी अधिकृत वृत्तनिवेदन जारी केले आहे. या वृत्तनिवेदनानुसार, रॅपिडो कंपनीने बीड जिल्ह्यासाठी बाईक टॅक्सीकरिता कोणताही वैध ॲग्रीगेटर परवाना प्राप्त केलेला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन ॲग्रीगेटर नियम, २०२६ मधील नियम ४(११) नुसार वैध ॲग्रीगेटर परवान्याशिवाय वाहन अथवा चालक ऑनबोर्ड करणे आणि प्रवासी वाहतूक सेवा देणे नियमबाह्य असल्याचे परिवहन विभागाने नमूद केले आहे. तसेच कंपनीविरोधात नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही स्पष्ट केले आहे. विशेषतः महिला प्रवाशांची सुरक्षितता, चालकांची पडताळणी, पोलीस व्हेरिफिकेशन, विमा संरक्षण आणि तक्रार निवारण यंत्रणा या मुद्द्यांकडेही युवासेनेने लक्ष वेधले होते. परिवहन विभागाने बीड जिल्ह्यातील नागरिकांना रॅपिडो बाईक टॅक्सी ॲपचा वापर करू नये, तसेच दुचाकी वाहनमालकांनी आपली वाहने या ॲपवर नोंदवू नयेत, असे आवाहन केले आहे. युवासेनेने परिवहन मंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीनंतर अवघ्या एका दिवसात परिवहन विभागाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आली असून, बीडमधील विनापरवाना बाईक टॅक्सी सेवेचा प्रश्न आता चर्चेत आला आहे.

योगेश्वरी शिक्षण संस्थेत

सिंचन व जलव्यवस्थापन क्षेत्रातील प्रश्नांवर अभ्यासपूर्ण चर्चा होऊन भविष्यातील उपाययोजनांना दिशा मिळण्यास मदत होणार आहे. या नियोजन बैठकीस पर्यावरणप्रेमी, सिंचन क्षेत्रातील अभ्यासक, पाणी परिषदेचे अभ्यासक, प्रसिद्ध स्थापत्य अभियंते तसेच जलव्यवस्थापन आणि पर्यावरण क्षेत्रात रुची असलेल्या सुजाण नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले आहे.

कड्याच्या बाजारतळावर

कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू

या प्रकरणात संबंधित शेख बनिमिया यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांच्या तपासातून या साठ्याबाबतची अधिकृत माहिती आणि पुढील कारवाईचे स्वरूप स्पष्ट होणार आहे. दिवाळीच्या सणात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्यामुळे अवैध साठवणूक, नियमबाह्य विक्री आणि संभाव्य दुर्घटनांना कारणीभूत ठरू शकणाऱ्या प्रकारांवर पोलिसांनी लक्ष ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे. कडा बाजारतळावरील या कारवाईमुळे फटाक्यांच्या साठवणुकीच्या नियमांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पोलिसांच्या पुढील तपासाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पाटोद्यात परवानाधारक सावकार

नागरिकांनी पुढे येऊन न घाबरता तक्रार करावी

खासगी सावकारीच्या नावाखाली विनापरवाना व्यवसाय सुरू असलेल्या किंवा अवाजवी व्याज आकारणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांनी कोणत्याही दबावाला न जुमानता किंवा न घाबरता सहायक निबंधक कार्यालयात येऊन रीतसर तक्रार दाखल करावी, असे आवाहन सहकार विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

इनाम जमीनधारकांच्या

समाज, गुरव, ब्राह्मण, गोंधळी, घडसी, कोळी, बैरागी यांच्यासह इतर समाजांतील इनाम जमीनधारकांनी सहभागी होऊन आपल्या प्रश्नांसाठी एकजूट दाखवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

इनाम जमीनधारकांच्या प्रश्नांसाठी एकजुटीची हाक!

इनाम जमिनीशी संबंधित प्रश्न

देवस्थान इनाम जमीन धारस्काना फार्मर आयडी लागू करा, देवस्थान इनामी जमिनीचे तात्काळ पंचनामे करा व प्रलंबित विरासद शर्टभंग, विलंबमाफी जलद गतीने मंजूर करा हे प्रश्न सोडविण्यासाठी समाजबांधवांनी संघटित होणे आणि आपल्या मागण्या प्रभावीपणे मांडणे आवश्यक असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील प्रत्येक भागातील इनाम जमीनधारकांनी या आक्रोश मेळाव्यात सहभागी होऊन आपल्या न्याय्य हक्कांच्या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

माजलगावात गणेश मंदिर येथे माफक दरामध्ये दिवाळी फराळाची विक्री

माजलगाव । प्रतिनिधी

येथील स्व.कमलाबाई मुंदडा गोशाळेच्या वतीने अल्पशा नफ्यावर माजलगावकरांसाठी प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन



करून विक्री चालू करण्यात आली आहे. या दिवाळी फराळाच्या विक्री तुन गो शाळेस आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने करण्यात आले आहे माजलगावकरांच्या हातुन सामाजिक कार्य घडावे हा मुख्य हेतू या मधे साद्या होवून गोशाळे ची प्रगती होवी.

हा उपक्रम मागील १० वर्षा पासून हा अविरतपणे चालू आहे.

यातील खाद्यपदार्थ स्वादिष्ट व रुचकर असतात तसेच स्वच्छतेचे सर्व बाबी लक्षात घेऊन, पदार्थाची गुणवत्ता व अन्न व औषध प्रशासनाचे सर्व नियमात हे खाद्यपदार्थ तयार करणे चालू आहे. माजलगावकर या गोशाळाच्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी फराळ खरेदीसाठी गर्दी करतात.बाहेर गावावरून या दिवाळी फराळाची खरेदी कराण्यासाठी लोक येत आहेत. जुना मोंढा, माजलगाव येथील गणपती मंदिर येथे स्टॉल सकाळी ९:०० ते रात्री ९:०० पर्यत चालू असतो. या वर्षी माजलगाव तालुक्यातील प्रसिद्ध राजस्थानी आचारी उग्रा महाराज यांच्या वतीने गोशाळेची सेवा मध्ये हे कार्य चालू आहे त्यांचे स्पेशल काजु मैसूर पाक,काजु अजिर रोल,व पान मिठाई हे पदार्थ वाढवण्यात आली आहेत. या दिवाळी फराळा सेवा यशस्वी होण्यासाठी गो शाळा समिती व गोशाळाचे सेवेकरी करतात या मध्ये जगदीश चांडक व गो शाळेचे अध्यक्ष जुगल किशोर भुतडा,व पदाधिकारी, प्रदिप रुद्रवार, विष्णूदास करवा, सुरेश दुगड,भगवान लाटे,सुभाब इंदाणे, गणेश लोहिया हे विशेष कार्य करतात.

कुटुंबातील अध्यात्मिक वातावरण हीच आनंदी जीवनाची गुरुकिल्ली - अश्वीनीताई वाकणकर

श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात कुटुंब एकत्रीकरण व कोजागरी पौर्णिमा उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अमृतमहोत्सवी वर्षे व श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे हिरक महोत्सवी वर्षानिमित्त येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात



आज कोजागरी पौर्णिमा निमित्त कुटुंब एकत्रीकरण व कोजागरी पौर्णिमेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी साहित्यिक अश्वीनीताई वाकणकर बोलत होत्या, यावेळी त्यांनी सांगितले की, कुटुंबात अध्यात्मिक वातावरण असणे आवश्यक आहे. अध्यात्मिकतेतून सकारात्मक विचार निर्माण होऊन जीवन आनंददायी बनते. हे सांगताना त्यांनी विविध संत साहित्याचा संदर्भ देत अभ्यासपूर्ण कुटुंब प्रबोधन केले. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन माता सरस्वती, पंच परिवर्तन प्रतिमेचे पूजन करून झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात पालक प्रकाश दुगड हे होते तर व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अड विश्वास जोशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलातील शिशुविहार ते वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वरचित कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रकाश दुगड यांनी केले, प्रास्ताविक माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप यांनी केले. आभार मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी मानले तर सुत्रसंचालन श्रीमती स्मिता पांडे, श्रीमती सत्यभामा मोरे यांनी केले. यावेळी श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व स्थानिक संस्था पदाधिकारी, सभासद, सर्व संस्कार केंद्र प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. यानंतर सर्वांना दुध वाटप करण्यात आले.

माळापुरी एमआयडीसी प्रस्ताव रद्द होणार, अमरसिंह पंडितांची ग्वाही

माळापुरीत शेतकरी संवाद बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

स्व. अजितदादा पवार यांच्या बीड जिल्हा विकास संकल्पनेतून बीड तालुक्यातील माळापुरी-घोसापुरी-पेंडगाव शिवारात प्रस्तावित करण्यात आलेल्या एमआयडीसी प्रस्तावास स्थानिक शेतकऱ्यांनी ठाम विरोध दर्शविला आहे. शेतकऱ्यांच्या भावना आणि त्यांच्या भविष्याचा प्रश्न गांभीर्याने घेत हा प्रस्ताव रद्द केला जाईल. असे

जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते, माजी आ. अमरसिंह भैय्या पंडित यांनी शेतकऱ्यांना ठोस आश्वासन दिले आहे. पुढील आठवड्यात शेतकरी शिष्टमंडळासह उपमुख्यमंत्री व जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन जनभावनांची तीव्रता आणि शेतकऱ्यांची ठाम विरोधाची एकमुखी भूमिका त्यांच्या निदर्शनास आणून दिली जाईल. माळापुरी-घोसापुरी-पेंडगाव शिवारातील शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध हा एमआयडीसी प्रस्ताव पुढे जाऊ दिला जाणार नाही; जनभावनांचा आदर राखून प्रस्ताव रद्द करण्यासाठी आपण ठामपणे पाठपुरावा करू, असा विश्वास अमरसिंह भैय्या पंडित यांनी शेतकऱ्यांना दिला. त्यांच्या या भूमिकेमुळे प्रस्ताव रद्द होण्याच्या आशेला बळ मिळाले असून, आता पालकमंत्र्यांच्या भेटीतून शेतकऱ्यांच्या बाजूने ठोस निर्णय होण्याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

या पार्श्वभूमीवर आज माळापुरी येथे माजी आ. अमरसिंह भैय्या पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी संवाद बैठक पार पडली. बैठकीत प्रस्तावित एमआयडीसी मुळे शेतकऱ्यांवर ओढवू शकणारे



आर्थिक संकट, शेतीवरील उपजीविका आणि भूमिहीन होण्याच्या भीतीमुळे निर्माण झालेली अस्वस्थता यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत जमीन बचाव संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक अशोकराव हिंगे, सामाजिक कार्यकर्ते मारुती तिपाले आणि अशोक ढास यांनी शेतकऱ्यांच्या समस्या व संभाव्य परिणामांची मांडणी केली. शेती हेच अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असून, प्रस्तावित भूसंपादना मुळे शंभर पेक्षा अधिक शेतकरी भूमिहीन होणार आहेत. जमिनीपासून वंचित झाल्यानंतर या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या भविष्याचा विचार करून हा प्रस्ताव तातडीने रद्द करावा, अशी ठोस मागणी यावेळी करण्यात आली.

प्रस्तावित एमआयडीसी साठी एकूण सुमारे १,०५० एकर जमीन संपादित करण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती बैठकीत मांडण्यात आली. यामध्ये माळापुरी येथील ६६० एकर, घोसापुरी येथील ३६५ एकर आणि पेंडगाव येथील २५ एकर क्षेत्राचा समावेश आहे. या भूसंपादनाच्या अनुषंगाने प्रशासन स्तरावर वेगाने हालचाली सुरू असून, जमीन सर्वेक्षणाचे कामही सुरू झाल्याने शेतकरी वर्गात असंतोष,संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित शेतकऱ्यांनी प्रस्तावित भूसंपादनाला विरोध दर्शवत जिल्हाधिकाऱ्यांकडे वेळोवेळी लेखी हरकती नोंदवल्या आहेत. तसेच आ. विजयराजे पंडित आणि माजी आ. अमरसिंह भैय्या पंडित यांची भेट घेऊन एमआयडीसी चा प्रस्ताव रद्द करण्याची मागणी केली होती. मात्र, शेतकऱ्यांनी विरोध नोंदवूनही सर्वेक्षण सुरू राहिल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हरकतींचा गांभीर्याने विचार करून प्रस्ताव रद्द करण्याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

या बैठकीस मार्केट कमिटी चे उपसभापती शामराव पडुळे,सरपंच अशोक ढास, घोसापुरी सरपंच शेख फारुख, कल्याण बांड, सरपंच सुंदर पवार, विश्वंभर गाडे, बाबासाहेब तिपाले

यांच्यासह माळापुरी, घोसापुरी आणि पेंडगाव या तिन्ही गावांतील महीला व शेतकरी बांधव मोठ्या उपस्थित होत

शेतकऱ्यांचा एकमुखी विरोध, प्रशासनाकडे नोंदवलेल्या लेखी हरकती आणि प्रस्तावित भूसंपादना मुळे निर्माण झालेली चिंता या पार्श्वभूमीवर अमरसिंह भैय्या पंडित यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. पुढील आठवड्यात पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीत शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडून एमआयडीसी प्रस्ताव रद्द करण्यासाठी ठोस निर्णय व्हावा, यासाठी जमीन बचाव कृती समिती व शेतकरी बांधव एकजुटीने पाठपुरावा करणार आहेत.

नाफेड, एनसीसीएफच्या खरेदी केंद्रांवर नजर ठेवण्यासाठी दक्षता समिती

नाशिक : प्रतिनिधी

फेड अन् एनसीसीएफ या केंद्रीय संस्थांच्या माध्यमातून राज्यभरात ४४ खरेदी केंद्रांवर कांदा खरेदीला (घरपवर घहरीशवळ) सुरुवात करण्यात आली असून कांदा खरेदीत दोन वर्षापासूनची अनियमितता पाहता प्रत्येक खरेदी केंद्रावर नजर ठेवण्यासाठी आता दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या संदर्भातील आदेश राज्य शासनाचे अवर सचिव संगीता शेळके यांनी शुक्रवारी सायंकाळी काढले.

४३ खरेदी केंद्रांपैकी तब्बल ३८ खरेदी केंद्र एकट्या नाशिक जिल्ह्यातील (छरीहळज्ञ ऊर्ळीीळलीं) आहे. तसेच जुन्नर, पारनेर, वैजापूर, संगमनेर येथील पाच खरेदी केंद्रावरही दक्षता समितीची नजर असेल. प्रत्येक ठिकाणचे तहसीलदार, बाजार समिती सचिव, सहायक निबंधक, जिल्हा पणन अधिकारी यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे. कांदा खरेदी अनियमितता किंवा प्रक्रियेदरम्यान गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने समिती पथक नियुक्त करण्यात येत आहे. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांनी कांदा विक्री केलेली आहे व किती नोंदणीकृत शेतकऱ्यांची कांदा विक्री प्रलंबित आहे. खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वर पीक पेरा सदरात कांदा पिकाची नोंद आहे काय, शेतकऱ्याला खरेदी केलेल्या कांद्याची वजन पावती दिली जाते काय आदी बाबींची तपासणी दक्षता समिती सदस्य करतील. कांदा खरेदीत अनियमितता होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे विविध लोकप्रतिनिधी तसेच शेतकरी संघटनांनी केली होती. त्या अनुषंगाने व्यवहारात पारदर्शकता यावी यासाठी शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली दक्षता समिती प्रत्येक कांदा खरेदी केंद्रावर बारकाईने नजर ठेवेल.



दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८६४ : नेवाडा हे अमेरिकेचे ३६ वे राज्य बनले.
१८७६ : भारतात आलेल्या महाभयानक चक्रीवादळात २,००,००० पेक्षा अधिक व्यक्ती ठार
१८८० : धनत्रयोदशी (आश्विन वद्य त्रयोदशी) च्या दिवशी पुण्यातील आनंदोद्भव थिएटरमधे किर्लोस्करांच्या 'संगीत शाकुंतल' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९२० : नारायण मल्हार जोशी, लाला लजपतराय व इतर काही जणांनी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना केली. लाला लजपतराय पहिले अध्यक्ष बनले.
१९४१ : 'माऊंट रशमोअर' या स्मारकाचे बांधकाम पूर्ण झाले.
१९६६ : दिल्ली उच्च न्यायालयाची स्थापना
१९६६ : प्रसिद्ध भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी पनामा कालवा पोहून पार केला.
१९८४ : पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांकडून हत्या
१९८४ : भारताचे ६ वे पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांनी सूत्रे हाती घेतली.
२०११ : जागतिक लोकसंख्या सात अब्जांपर्यंत पोचली.


जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३९१ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (मृत्यू: ९ सप्टेंबर १४३८)
१८९७ : चीन गणराज्य (तैवान) चे पहिले पंतप्रधान चियांग काई-शेक यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल १९७५)
१८९५ : सी. के. नायडू क्रिकेटपटू (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९६७)
१८७५ : सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष, भारतरत्न (मरणोत्तर १९९१) (मृत्यू: १५ डिसेंबर १९५०)
१९६१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व माजी केंद्रीय क्रीडा व युवा कार्यमंत्री तसचं, आसाम राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री सेर्बानंद सोनोवाल यांचा जन्मदिन.
१९२२ : कंबोडिया देशाचे पहिले पंतप्रधान नॉरदॉम सिहानोक यांचा जन्म. (मृत्यू: १५ ऑक्टोबर २०१२)
१९४६ : रामनाथ पारकर क्रिकेटपटू (मृत्यू: ११ ऑगस्ट १९९९)

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : मूळशंकर करसनदास तिवारी तथा स्वामी दयानंद सरस्वती संस्कृत विद्वान आणि आर्य समाजाचे संस्थापक (जन्म: १२ फेब्रुवारी १८२४ तनकारा, मोर्वी, राजकोट, गुजरात)
१९२९ : भारतीय-इंग्लिश अभिनेते नॉर्मन प्रिचर्ड यांचे निधन. (जन्म: २३ जून १८७७)
१९७५ : सचिन देव बर्मन संगीतकार व गायक (जन्म: १ आक्टोबर १९०६)
१९८४ : भारताच्या ३ र्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या झाडुन हत्या केली. (जन्म: १९ नोव्हेंबर १९१७)
१९८६ : आनंदीबाई शिर्के लेखिका, बालसाहित्यिका (जन्म: ३ जून १८९२)
२००१ : प्रसिद्ध भारतीय मुत्सद्दी आणि भारताचे अमेरिकेतील राजदूत तसचं, भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे पुतणे ब्रज कुमार नेहरू यांचे निधन.
२००५ : अमृता प्रीतम पंजाबी भाषेतील प्रतिथयश लेखिका आणि कवयित्री. त्यांच्या 'कागज ते कॅनव्हास' या कवितासंग्रहासाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार (१९८१) देण्यात आला. 'रसीदी टिकट' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (जन्म: ३१ ऑगस्ट १९१९)
२००९ : सुमती गुप्ते मराठीत तमाशाप्रधान चित्रपटांची चलती असताना पडद्यावर केवळ सोज्वळ नायिका रंगवून आपल्या सहजसुंदर अभिनयाची मोहोर उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री.

गव्हासाठी वापरा पोटॅशियम नायट्रेट; दाणे भरण्यासह वाढेल उत्पादन



सध्या रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा पिके ही पेरणीचा कालावधी सरू हात आहे. गव्हाच्या योग्य वाढीसाठी पोटॅशियम नायट्रेट (१३-००-४५) हे खत तुम्ही वापरू शकता. या खताचा वापर गव्हाच्या भरदार दाण्यांसाठी महत्वपूर्ण ठरतो. तसेच उत्पन्नातही भरघोस वाढ होते. पोटॅशियम नायट्रेट या खताच्या गहू पिकासाठीच्या वापराबाबत सविस्तरपणे जाणून घेतल्यास मोठा फायदा होतो.

पोटॅशियम नायट्रेटचे फायदे : पोटॅशियम नायट्रेट हे खत पूर्णपणे पाण्यात विरघळते. या खतामध्ये १३ टक्के नायट्रोजन आणि ४५ टक्के पोटॅशियमचे प्रमाण असते. कॅल्शियमचे प्रमाण अधिक असल्याने या खताच्या वापरातून गव्हाची ओंबी ही मोठी आणि दाणे भरदार होतात. हे खत गहू पिकाला पाण्याचा ताण पडल्यास किंवा अतिरिक्त पाणी दिले गेल्यास सुरक्षा रक्षक म्हणून काम करते. इतकेच नाही तर पोटॅशियम नायट्रेट हे खत गव्हासोबतच अन्य पिकांसाठी देखील महत्तवपूर्ण मानले गेले आहे. या खताच्या वापरामुळे गहू पिकाची रोग प्रतिकारशक्ती वाढण्याबरोबरच उत्पादन क्षमता देखील वाढते. या खताच्या वापराने गहू उत्पादन २० टक्क्यांपासून ते ४० टक्क्यांपर्यंतचे वाढू शकते.

वापर करण्याची वेळ : पोटॅशियम नायट्रेट या खताचा वापर प्रामुख्याने खुरपणी झाल्यानंतर लगेचच करावा. जेणेकरून या खताची मात्रा ही पीक मधल्या अवस्थेत आल्यानंतर आणि परिपक्व होईपर्यंत पूर्ण लागू होते. या खताचा वापर ठिबक पद्धतीने पाण्यातून करू शकता. ठिबक पद्धतीने हे खत देताना प्रति लिटर पाण्यासाठी १.५ ते २.५ ग्रॅम खताचे प्रमाण ठेवणे गरजेचे असते. ठिबक व्यवस्था नसल्यास फवारणी पद्धतीने देखील हे खत गहू पिकाला देऊ शकता. हे खत गहू पेरणीनंतर दोन महिन्यांच्या आत द्यावे.

पोटॅशियम नायट्रेटचे फायदे : गव्हाच्या फुटव्यांसाठी फायदेशीर असते. गव्हाच्या मुळांची वाढ झपाट्याने होते. गहू पिकाच्या पानांमध्ये हरितद्रव्यांची वाढ होऊन, उत्पादन वाढीस मदत होते. गहू पिकाला रोग प्रतिकारशक्ती प्रदान करते. गव्हाच्या दाण्यांमध्ये चमक येते. दाण्यांच्या फुगवणीसाठी मदत करते. गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. गहू पिकामध्ये कार्बोहायड्रेटचे प्रमाण वाढण्यासाठी मदत होते. पाण्याचा ताण पडल्यास, पिकाला ताण सहन करण्याची शक्ती प्रदान करते.

हळद किडींचे नियंत्रण करा अन् घ्या भरमसाठ उत्पादन

सध्या हळद पिकामध्ये किडींच्या प्रादुर्भाव होण्यास पोषक स्थिती आहे. या काळात किडींचा प्रादुर्भाव झाल्यास हळद पिकावर अनिष्ट परिणाम होतो. त्याचा थेट संबंध उत्पन्न आणि कंदाचा दर्जा यांच्याशी येतो. त्यामुळे हळद पिकात किडींपासून वेळीच नियंत्रण करणे गरजेचे आहे. मागील काही दिवसांत राज्यात झालेल्या दमदार पावसाने बहुतांश ठिकाणी पिकात पाणी साचून राहिल्याची स्थिती होती. त्यासाठी पिकांत साचलेल्या पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा करून घ्यावा. मागील आठवडाभरापासून पावसाने विश्रांती घेतलेली आहे. सद्यःस्थितीत ढगाळ हवामान, तापमानातील चढ-उतार, आर्द्रता यामुळे हळद पिकांतील कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक हवामान स्थिती निर्माण झाली आहे. हळद पिकामध्ये उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा जमिनीत वाढणारे कंद आहेत. हळद पिकावर कीड-रोगांच्या प्रादुर्भाव झाल्यामुळे त्याचा थेट परिणाम कंदाच्या दर्जावर होतो. त्यासाठी पिकाचे नियमित निरिक्षण करून त्वरित उपाययोजना कराव्यात जेणेकरून संभाव्य नुकसान टाळले जाईल. कंदमाशी : हळद पिकावर नुकसान करणारी ही प्रमुख कीड आहे. कंदमाशीचे जीवनचक्र चार आठवड्यांत पूर्ण होते. कंदमाशी डासासारखी पण आकाराने मोठी व काळसर असते. पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायाची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. अळी पिवळसर असून तिला पाय नसतात. कंदमाशी खोडाच्या बुंध्याजवळ किंवा उघड्या कंदावर अंडी घालते. अंड्यातून ५ ते ७ दिवसांत लालसर अळी बाहेर पडून ती उपजीविकेसाठी कंदात शिरतात.

नुकसानीचा प्रकार : कंदामध्ये अळ्यांचा शिरकाव झाल्याने तेथे रोगकारक बुरशी तसेच सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन कंद मऊ होतात. कंदांना पाणी सुटून ते कुजू लागतात. लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक अनुकूल असतो. या किडीमुळे हळद पिकाचे सुमारे ४५ ते ५० टक्के पर्यंत नुकसान होते. ही कीड सप्टेंबर महिन्यापासून पीक काढणीपर्यंत नुकसान करते.

नियंत्रण : शेतातील पीक अवशेष, सडके कंद नष्ट करावेत. उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. शिफारशीत केलेल्या वेळेवर हळदीची भरणी करावी. हळदीनंतर पुन्हा हळद किंवा आले यासारखी पिके सलग त्याच क्षेत्रामध्ये घेऊ नयेत. पीक फेरपालट करावी. हेक्टरी ६ पसरट भांडी (माती अथवा प्लॅस्टिकची) वापरून प्रत्येक भांड्यात भरडलेले एरंडीचे बी २०० ग्रॅम घेऊन त्यात १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशा आकर्षित होतात. त्यात पडून मरू लागतात. ही उपाययोजना अत्यंत प्रभावी, कमी खर्चिक व सहजरीत्या करण्यासारखी आहे. तसेच कंदांचे नुकसान करण्याअगोदरच कंदमाश्या नियंत्रित होत असल्याने विशेष प्रभावी उपाययोजना आहे. सेंद्रिय हळद उत्पादनामध्येही ही महत्त्वाची आहे.

रासायनिक फवारणी : क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार फवारणी करावी.

पाने खाणारी अळी : पावसाळ्यात वाढलेल्या आर्द्रतेमुळे या किडीचा प्रादुर्भाव दिसू लागतो. पाने सुरळी किंवा पोंगा अवस्थेत असताना ही अळी पानावर उपजीविका करते.

पान खाऊन सुरळीमध्ये छिद्र करते. सुरळीतील पान पूर्णपणे उलगडल्यानंतर एका सरळ रेषेमध्ये पानांवर छिद्रे आढळून येतात.

नियंत्रण : गुंडाळलेली पाने तसेच अळी व कोष वेचून नष्ट करावेत. रासायनिक फवारणी : प्रतिलिटर पाणी. क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि.



चंदन लागवड तंत्रज्ञान



चंदन हा सदाहरित वृक्ष असून त्याच्या फांद्या सडपातळ, सरळ अथवा वाकड्या असतात. याची उंची साधारणपणे १२ ते १५ मिटर असून घेर २ ते २.५ मिटरपर्यंत असतो. याची पाने सदाहरित, अंडाकार, टोकदार, समोरा-समोर व देठाकडे निमुळती असतात. खोड लहान व कमी जाडीचे असते तेव्हा मऊ असते. परंतु जस-जसे झाड मोठे होते तसे त्याची साल खरबरीत व उभ्या चिरा असलेली बनत जाते. याचे लाकूड कठीण, सुक्ष्म दाणेदार कणांनी बनलेले तेलयुक्त असते. लाकडाचा बाहेरील भाग सफेद व सुगंधहिन असतो. तर आतील गाभा पिवळसर ते तपकिरी असून तो अतिशय सुगंधी असतो. यामध्ये तेलाचे प्रमाण १ ते ६% असते. चंदनाचे मूळ हे सुरूवातीस बऱ्यापैकी लांब, नाजूक व लवचिक असते. बाजूकडील मुळे संख्येने भरपूर, तंतूमय, नाजूक व मुख्य मुळाच्या खाली पसरलेली असतात.

रोपे तयार करणे : लहान रोपे अति सुर्यप्रकाशात व उष्णतेमुळे किंवा कमी पाण्यामुळे सुकू शकतात. त्यासाठी सावली व पाण्याची व्यवस्था करावी. ताजे बियाणे २ महिन्यापर्यंत सुप्तावस्थेत असते. त्यामुळे त्यावर पाणी अथवा हवेची प्रक्रिया होऊ शकत नाही. याकरिता जर्मिनेटर ५० मिली, प्रिझम ५० मिली, १ लि. पाणी या प्रमाणातील द्रावणात बी रात्रभर भिजत ठेवून त्याची सुप्तावस्था नष्ट होऊन १ ते १।। महिन्यात अंकूरताना दिसतात. एरवी ३ महिन्यापर्यंत देखील अंकुरलेली दिसत नाहीत. २ वर्षापासून १० वर्षापर्यंतच्या झाडांवरील बियांपासून रोपे तयार करताना उगवणक्षमतेत कोणताही फरक आढळून येत नाही.

गादी वाफ्यावर बी लागवड पद्धत : गादीवाफे २ प्रकारचे केले जातात. ज्या भागात पाऊस जास्त पडतो तेथे उंच गादीवाफे तर इतर भागात जमिनीला समांतर खणून वाफे बनविले जातात. साधारणपणे वाफे १० मिटर १ मीटर आकाराचे करून १५ सेंमी उंची ठेवावी. यामध्ये लालमाती व चाळलेली वाळू २:१ प्रमाणात घेऊन वाफे बनवावेत. अशा वाफ्यात प्रक्रिया केलेले ४ किलो बी पसरून घेऊन त्यावर २ सेंमी जाडीचा वाळूचा थर देऊन त्यावर वाळलेले गवताचे अच्छादन करावे. वाफ्यास रोज झारीने अथवा स्प्रिंक्लरने पाणी द्यावे. वाफ्यांचा उन्हापासून बचाव करण्यासाठी सावलीची सोय (शेडनेट ५०%) करावी. बी उगविल्यानंतर गवताचे अच्छादन अलगद काढून टाकवे. नर्सरीचे योग्य नियोजन होण्याच्या दृष्टीने बियाणे डिसेंबर-जानेवारीत पेरावे.

पिशवीत रोपे लावणे : बी गादीवाफ्यावर पेरल्यानंतर २५ ते ३० दिवसात रोपे उगवण्यास सुरुवात होते. रोपे लगेच पिशवीत लावावीत. अशी रोपे लवकर रूजतात. रोपांवर दर १५ दिवस ते १ महिन्याच्या अंतराने सप्तामृत २५० मिली १०० लि. पाण्यातून फवारावे. म्हणजे रोपांची निरोगी व जोमाने वाढ होते. साधारणपणे ६ ते ८ आठवड्यानंतर रोपांची सावली काढून टाकवी व रोपांच्या पिशव्या अधून मधून फिरवत रहाव्यात. जेणेकरून मुळे जमिनीत रूजणार नाहीत. ६ ते ८ महिन्यामध्ये रोपे २५ ते ३० सेमी उंचीची तपकिरी रंगाचे खोड झालेली लागवडीयोग्य उपलब्ध होतात. १ किलो बियापासून साधारणपणे २,००० रोपे तयार होतात.

लागवड पद्धत : मान्सून पावसाची सुरुवात होताच जून, जुलै, ऑगस्ट मध्ये रोपांची लागवड करता येते. याकरीता उन्हाळ्यामध्ये मार्च महिन्यात १६'१२' अंतरावर १.५ १.५ १.५ फुटाचे खड्डे खोदून घ्यावेत. खड्डयामध्ये किटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करून अर्धा खड्डा सेंद्रिय अथवा कंपोस्ट खत, निंबोळी पावडर व कल्पतरू सेंद्रिय खत (२५० ग्रॅम) ने भरून घ्यावा. त्यानंतर एक पाऊस झाल्यावर जमिनीत ओल असताना रोपांची लागवड करावी व शेजारच्या खड्डयामध्ये यजमान वृक्षाच्या रोपांची लागवड करावी. यजमान रोप कालांतराने मरते व चंदन त्याच्या जवळ असल्याने इतर दिर्घायुषी यजमान वृक्षाच्या मुळांमधून आपले आवश्यक ते अन्न शोषण सुरू करते.

आंतरपिक : चंदन व यजमान वृक्षाची लागवड करताना दोन ओळींमध्ये किमान १० फूट जागा उपलब्ध होऊ शकेल. या जागेत पहिले ४-५ वर्षापर्यंत हरभरा, उडीद, मूग, भुईमूग अशी आंतरपिके घेतल्यास लागवडीस पोषक वातावरण मिळून चंदनाची वाढ जोमदार होते. आंतरपीक घेताना जमीन नांगरणी/वखरणी केली जाते. शेताला पाणी, खते दिली जातात. कडधान्यामुळे जमिनीत हवा खेळती राहते. नत्राचे प्रमाण वाढते. या सर्वांचा चंदन वाढीस फायदा होतो. या पिकांबरोबरच औषधी वनस्पतींमध्ये सर्पगंधा, अश्वगंधा, सफेद मुसळी, शतावरी, कोरफड अशी पिके घेता येतात.

जमीन : लाल, काळी, चिकणमाती ते वाळू मिश्रीत लोहयुक्त, उत्तम निचरा होणारी, उत्तम उपजावू चिकण माती व नदी काठच्या निचऱ्याच्या पोयटायुक्त जमिनीत चंदनाची वाढ अगदी जोमाने होते. पाणी दिल्यानंतर विस्तारणारी माती, तसेच कॅल्शियम, मॅग्नेशियम व पोटॅशयुक्त जमीन झाडाची उंची व घेर वाढीस फायदेशीर ठरते. जमिनीचा सामू हा ६.५ ते ८.२ असणारी जमीन चंदन लागवडीस योग्य समजली जाते.

हवामान : चंदनाने झाड हे ६०० ते १,६०० मि.मी. पर्जन्यमान असलेल्या पर्जन्यमान असलेल्या प्रदेशात व १२ ते ४५ डी. से. तापमानात चांगले वाढते. साधारणपणे थंड हवा, मध्यम पर्जन्यमान व भरपूर सुर्यप्रकाश तसेच भरपूर काळ कोरडी हवा चंदनास उत्तम ठरते.

पाणी : चंदनाच्या झाडाला पहिल्यावर्षी ठिबकने आठवड्यातून २ ते ३ वेळा पाणी द्यावे. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी आठवड्यातून २ वेळा पाणी ठिबकने द्यावे. चौथ्या वर्षापासून चंदनास नोव्हेंबर - डिसेंबरमध्ये पाणी देण्याची गरज नसते. तसेच जानेवारी ते जून या काळात आठवड्यातून एकदा पाणी द्यावे. पावसाळ्यात पाऊस असल्यास पाण्याची आवश्यकता नसते. मात्र पावसाने ताण दिल्यास गरजेप्रमाणे महिन्यातून २ वेळा तरी पाणी द्यावे. आंतरमशागत : लागवडीनंतर प्रत्येक वर्षी ऑक्टोबरमध्ये १ मीटर व्यासाची वर्तुळाकार माती कुदळीने १५ सेमी. पर्यंत खोदून कल्पतरू सेंद्रिय खत २५० ग्रॅम ते १ किलोपर्यंत आवश्यकतेनुसार झाडाच्या वयाप्रमाणे तसेच सुगंधी गाभ्याची अधिक वाढ होण्यसाठी सप्तामृताच्या फवारण्या दर महिन्याला कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार कराव्यात.

मंजुरीअभावी २१५ कोटींच्या कामांना ब्रेक; ३७४ वर्गखोल्यांचे काम रखडले

जि.प.कडे निधी नाही, ६६ अंगणवाड्या भरतात उघड्यावर

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या २१५ कोटी रुपयांच्या विकासकामांच्या अंतिम याद्या विहित मुदतीत सादर करूनही, त्यांच्या निधी वितरणाबाबत आणि प्रशासकीय मंजुरी मिळाली नाही. जिल्ह्यातील तब्बल ३७४ धोकादायक शाळा खोल्या पाडून बांधण्याची गरज आहे. कन्नड तालुक्यातील औराळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत धोकादायक स्थितीत असून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. तर जिल्ह्यातील ६६ अंगणवाड्या उघड्यावर भरत असून त्यांची इमारत देखील या नियोजनात अडकली आहे. दरम्यान, भाजपने जि.प.मध्ये सत्ता स्थापनेवेळी चेकमेट दिल्याने पालकमंत्र्यांनी निधी अडवल्याची चर्चा आहे.

जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांचे नियोजन केले जाते.



यातून रस्ते, बांधकाम, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि समाजकल्याण अशा महत्त्वाच्या विभागांतील कामांसाठी निधीची तरतूद केली जाते. मात्र, नियोजन विभागाने नुकत्याच जारी केलेल्या ५ ऑक्टोबरच्या शासन निर्णयामुळे या कामांच्या मंजुरीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवले असून कामांना मंजुरी देण्याची विनंती केली आहे. या संभ्रमामुळे मंजुरीला विलंब होत असून, याचा थेट फटका विकासकामांच्या अंमलबजावणीला आणि निधी खर्चाच्या नियोजनाला बसण्याची शक्यता आहे. प्रशासनाकडे विहित वेळेत याद्या सादर केल्या शासन निर्णयातील तरतुदी प्रामुख्याने अशा जिल्ह्यांसाठी आहेत जिथे विकासकामांच्या अंतिम याद्या निश्चित झालेल्या नाहीत किंवा ज्यांची प्रशासकीय मान्यता प्रलंबित आहे. मात्र, जिल्हा परिषदेने २१५ कोटींच्या विकासकामांच्या याद्या विहित वेळेत सादर केल्या आहेत. त्यामुळे विलंबासंदर्भातील तरतुदी जिल्ह्याला लागू होतात की नाही? प्रशासनाने स्पष्टता देणे गरजेचे आहे. - अविनाश गलांडे, अध्यक्ष, जिल्हा परिषद ८ महिन्यांत जिल्हा परिषद सदस्यांसाठी निधीच नाही जिल्हा परिषद सदस्यांचा पदभार स्विकारून ८ महिने झाले तरी निधी मिळाला नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना खीळ बसली आहे. शासनाने याबाबत निर्णय घेऊन विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी सदस्यांमधून करण्यात येत आहे. दुष्काळी स्थितीमुळे ग्रामीण भागातील कामांना मागणी वाढली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रानुसार आम्ही नियोजन समितीकडे वेळेत कामांची यादी सादर केली आहे. आचारसंहिता संपताच जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या कामांना मंजुरी द्यावी. जनतेच्या कामांत कोणताही अढथळा निर्माण करू नये. जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत निर्णय घ्यावा

पीएफ कपातीची रक्कम मिळत नसल्याने उपोषण



अंबड। प्रतिनिधी

अंबड नगर परिषदेत कंत्राटी सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पीएफ कपातीची रक्कम संबंधित खात्यात जमा करण्यात यावी, तसेच दिवाळी बोनस, सुरक्षा साहित्य आणि इतर प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी मराठवाडा नगर पालिका कामगार कर्मचारी युनियन संघटनेच्या वतीने मुख्याधिकारी, नगर परिषद यांना निवेदन देण्यात आले होते परंतु निविदांचे दखल ना घेतल्यामुळे अंबड नगरपालिका समोर उपोषण सुरू करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून कंत्राटी सफाई कर्मचारी म्हणून सेवा बजावत असतानाही कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून पीएफची रक्कम कपात केली जात आहे. मात्र संबंधित रक्कम पीएफ खात्यात नियमित जमा होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच दिवाळी बोनस, सुरक्षा किट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. यापूर्वी १६ ऑक्टोबर २०२६ रोजीही प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने कामगारांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे २८ ऑक्टोबर २०२६ पासून नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. हे निवेदन नाना पटेकर आणि नामदेव शेवाळे यांनी मुख्याधिकाऱ्यांना सादर केले असून त्याची प्रत पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे आंबड यांनाही देण्यात आली आहे. सदरील यासंदर्भात सफाई कॉन्टॅक्टर यांना पीएफ प्रकरणी विचारले असता ते म्हणाले की नियमाप्रमाणे आम्ही नगरपालिकाला माहिती दिलेली आहे तसेच या प्रकरणी नगरपालिकाच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी सफाई कॉन्ट्रॅक्टर जबाबदार असल्याचे एका पत्राद्वारे उपोषण करते यांना कळविण्यात आले आहे .

मतदार यादीतील फेरबदलाविरोधात

काँग्रेसचे निदर्शने

'मत वाचवा, देश वाचवा'च्या घोषणांनी परिसर दणाणला; निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी



धाराशिव। प्रतिनिधी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळातील मतदार यादीतील फेरबदल व कथित अनियमितेच्या निषेधार्थ तहसील कार्यालयासमोर शहर काँग्रेस कमिटी व धाराशिव तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी जोरदार निदर्शने केली.

या वेळी आंदोलकांनी 'मत वाचवा, देश वाचवा', 'वोट चोर, गद्दी चोर' अशा घोषणा देत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणाची मागणी केली. घोषणांनी तहसील परिसर दणाणून गेला होता. काँग्रेस पक्षाच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये 'मत वाचवा, देश वाचवा' अंतर्गत अभियान प्रभावीपणे राबवले जात आहे. गुरुवारी काँग्रेस पक्षाच्या वतीने येथील तहसील कार्यालयासमोर दुपारी जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, प्रशांत पाटील, विनोद वीर, धनंजय राऊत, शीला उंबरे, खलील सय्यद, अजित शेळके, अग्निवेश शिंदे, मेहबूब पटेल आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळातील मतदार यादीतील फेरबदल व कथित अनियमितेची स्वतंत्र, निष्पक्ष, पारदर्शक चौकशी करण्यात यावी.

गुणवत्ता व परिश्रमावर विश्वास ठेवत ध्येयाकडे वाटचाल करा

विचारवंत विजय कुवळेकर यांचे शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अहिल्यानगर। प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या क्षमतांचा विकास करून त्यांना सर्वगुणसंपन्न बनविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखण्यासाठी शिक्षकांकडे निकोप, सकारात्मक आणि स्वागतशील दृष्टी असली पाहिजे. शिल्पकाराप्रमाणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवावे. ज्याचे शिकणे थांबते, त्याचे शिकवणे ही थांबते. त्यामुळे विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांनीही सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन विचारवंत विजय कुवळेकर यांनी केले. जीवनात उच्चपदावर पोहोचण्यासाठी परिश्रम, बुद्धिमत्ता, निष्ठा, जिद्द आणि चिकाटी या गुणांची आवश्यकता असते. परिस्थितीपेक्षा स्वतःमधील गुणवत्ता आणि मेहनतीवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी ध्येयाच्या दिशेने वाटचाल करावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन कुवळेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे समुपदेशक डॉ. सागर देशपांडे व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संचालक डॉ. जयंत कुलकर्णी उपस्थित होते. या समारंभात शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे व चित्रफितीचे अनावरण झाले. यावेळी संपदा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, कारभारी भिंगारे, श्रीहरी टिपूगडे, प्राचार्य शिवांजली अकोलकर व उपप्राचार्य प्रसाद बर्वे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे सचिव अरुण कुलकर्णी यांनी २५ वर्षांचा आढावा घेत विद्यार्थी कल्याणासाठी भविष्यातील ध्येय धोरणांची माहिती दिली. मुक्ता दिवेकर यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश बोपर्डीकर यांनी आभार मानले. कैलास जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. शिक्षिका श्रद्धा उगले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला तसेच उपप्राचार्य प्रसाद बर्वे यांना सीड्स ऑफ चेंज इनोव्हेटर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास विनोद बजाज, दिनेश अग्रवाल, राजेंद्र भगत, शरद कुलकर्णी, विजय कुलकर्णी, मुकुंद बिलोलीकर, सुमित सोनवणे, वरुण भगत, अक्षय वाघमोडे, सुहास मुळे, डॉ.सुनीता भागवत आदी उपस्थित होते. भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी नियोजन जयंत कुलकर्णी म्हणाले, पुढील काळात शैक्षणिक क्षेत्रात फार मोठ्या उलथापालथी होणार आहे. त्यामुळे त्याला तोंड देण्यासाठी आतापासूनच नियोजन केले पाहिजे. शिक्षक प्रशिक्षण केंद्रातून निर्माण होणारे काम दिशादर्शक असेल, असे सांगून भविष्यातील शिक्षण पद्धती व नियोजन याचे विश्लेषण त्यांनी केले.

मोटार न लावताच बोअरवेलमधून पाणी वाहू लागले; भाविकांमध्ये कुतूहल

लिंबागणेश। प्रतिनिधी

ऐन दुष्काळात सर्वत्र साठवण तलाव, विहिरी कोरड्या पडलेल्या असताना आणि अनेक बोअरवेल बंद पडलेल्या असताना बीड तालुक्यातील बालाघाटावरील बेलेश्वर संस्थानच्या इनामी जमिनीतील नव्याने घेतलेल्या बोअरवेलमधून मोटार न लावताच पाणी वाहू लागल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात आश्चर्य आणि कुतूहल व्यक्त होत असून, सद्गुरू ईश्वरभारती बाबांची कृपा असल्याची भावना मठाधिपती महंत महादेव महाराज भारती यांनी व्यक्त केली आहे.

बीड तालुक्यातील बालाघाटाच्या कुशीत असलेल्या सद्गुरू ईश्वर बाबा भारती यांच्या



पावनभूमीत मुळुकवाडी शिवारातील चांभारशेती येथे बेलेश्वर संस्थानची सुमारे ६५ एकर इनामी जमीन आहे. या शेतात काल दि.२९ रोजी रात्री बोअरवेल घेण्यात आला. त्यावेळी बोअरमध्ये मुबलक पाणी आढळून आले नव्हते. मात्र, आज सकाळी बेलेश्वर मंदिरात जाऊन शंभू महादेव आणि सद्गुरू ईश्वरभारती बाबांची विधिवत पूजा-अर्चना केल्यानंतर मठाधिपती महंत महादेव महाराज भारती शेतात आले. त्यावेळी बोअरवेलमध्ये मोटार न टाकताच त्यातून पाणी वाहत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हा अनुभव सद्गुरू ईश्वरभारती बाबांच्या कृपाशीर्वादामुळेच मिळाल्याची भावना महादेव महाराज भारती यांनी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलताना व्यक्त केली. एकीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी पाण्यासाठी हवालदिल झालेले असताना दुसरीकडे मोटार न लावताच बोअरवेलमधून पाणी वाहू लागल्याची घटना दिवसभर परिसरात चर्चेचा विषय ठरली. हा प्रकार पाहण्यासाठी भाविकांनी शेतात मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

पातूरमध्ये 'सुरक्षित बचपन'अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये बालहक्कांवर जनजागृती

पातूर। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला आणि तहसील विधी सेवा समिती, पातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी पातूर येथील एज्युबीला पब्लिक स्कूलमध्ये 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत बालसुरक्षा व बालहक्कांविषयी जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष डी. पी. सातवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांना त्यांचे मूलभूत बालहक्क, मिळणारे कायदेशीर संरक्षण, सुरक्षित वातावरणाचे महत्त्व, अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध कायदेशीर यंत्रणांची सविस्तर माहिती देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डी. एस. दाभाडे, पातूर तहसील विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी व फौजदारी न्यायाधीश एस. बी. मोरे, पातूरचे पोलिस निरीक्षक आर. पी. जाधव, गटशिक्षणाधिकारी पी. पी. डाबेराव, अधिवक्ता बी. आर. देशमुख, विधी स्वयंसेवक तथा शिक्षा समिती सदस्य ॲड. पंकज एस. पोहरे, ॲड. आर. पी. खांबलकर, सहाय्यक अधीक्षक सी. एच. भापट, विधी स्वयंसेवक अविनाश पोहरे, शाळेच्या प्राचार्या व्ही. एन. गाडगे उपस्थित होते.

जाहिर प्रगटण

मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क. रतर, बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५५/२०२६

(मार्फत विधिज्ञः ॲड जी.एस. कुलकर्णी)

अर्जदार :- १. राजेंद्र पि. मदनलाल छाजेड, वय ६२ वर्षे, धंदा व्यापार, रा. गणेश हाऊसिंग सोसायटी, जालना रोड बीड ता.जि.बीड २. संजय पि. मदनलालजी छाजेड वय ५८ वर्षे, धंदा व्यापार रा. गणेश हाऊसिंग सोसायटी, जालना रोड बीड ता.जि.बीड ३. सुवर्णा भ्र. संजय पोकरणा, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. कन्हेरीरोड, मोती नगर लातुर ता. जि. लातुर ४. साधना भ्र. मनोजकुमार भंडारी, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. माधवनगर, पैठण जि.छ. संभाजीनगर ५. आराधना भ्र. प्रमोद बलदोटा, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा.गणेश मंदीराजवळ पापडे गल्ली, कळंब ता. कळंब जि. धाराशिव

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे मदनलाल पि. नारायणदास छाजेड हे दिनांक २२/०९/२०२५ रोजी राहते घरी अन्विता हॉटेल जवळ जालना रोड बीड ता.जि. बीड येथे मयत्त झालेले आहे असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क ३ ते ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी, तसेच मयताचे आई, वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: २७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीखः ०४/१२/२०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत / -
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जाहिरनामा

मा. श्रीमती एस. डी. सोनी २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज १७९४/२०२६

विधीज्ञ शिंदे एन. एन.

संगीता सीताराम जगताप वि. निरंक

मागणी: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १. संगीता भ्र.सीताराम जगताप, वय ५९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वामनदादा पार्क, माऊली नगर, पालवन रोड, बीड ता. जि.बीड. २. जालिंदर पि. सीताराम जगताप, वय ३९ वर्षे, धंदा मजुरी, रा. सरकारी दवाखाना क्वार्टर, बशीरगंज, बीड, ता.जि. बीड. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सिताराम पि. एकनाथ जगताप, यांचा मृत्यु दिनांक ११/०८/२०२६ रोजी जिवनज्योत हॉस्पीटल, शिवाजीनगर, बीड ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार कं. २ हा मयताचा मुलगा आहे. मयतास मुलगी नाही. मयताचे आई, वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे सिताराम पि. एकनाथ जगताप यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यान येते की, सदरह अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून अमे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत सिताराम पि. एकनाथ जगताप यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०३.१२.२०२६ आहे.

आज दिनांक २२.१०.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

आदेशावरून
स्वाक्षरीत / -
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

स्वाक्षरीत / -
क. लिपीक
२ रे सह दिवाणी न्यायालय
व. स्तर बीड

संभाजीनगरात सपोर्ट दुरुस्ती करताना नवीन इमारतीचा स्लॅब कोसळला

३ मजूर बचावले, १ दबल्याची भीती, चिकलठाणा आठवडी बाजार परिसरातील घटना

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

चिकलठाणा येथील आठवडी बाजार परिसरात सुरू असलेल्या एका नव्या इमारतीच्या पार्किंगचा स्लॅब गुरुवारी (२९ ऑक्टोबर) रात्री ७.३० वाजेच्या सुमारास अचानक कोसळला. या दुर्घटनेत चार मजूर मलब्याखाली अडकले होते. सुदैवाने त्यापैकी ३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र, एक मजूर अद्यापही मलब्याखाली दबल्याचा संशय असून, रात्री उशिरापर्यंत अग्निशमन दल आणि पोलिसांकडून त्याचा युद्धपातळीवर शोध सुरू होता. अंकुश शांताराम कांबळे (३५, रा. विजयनगर, गारखेडा) आणि अशपाक शेख कडू (२५, रा. सुंदरवाडी) अशी बचावलेल्या जखमी मजुरांची नावे आहेत. मलब्याखाली अडकलेल्या बेपत्ता मजुराचे नाव खंडू असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तो अडकला की नाही याबाबतही संभ्रम आहे.

चिकलठाण्यातील आठवडी बाजारात निर्माणाधीन इमारतीचा स्लॅब कोसळल्यानंतर एक जण मलब्याखाली दबल्याच्या शंकेनंतर नागरिकांकडून त्याचा रात्री उशिरापर्यंत शोध घेण्याचे काम सुरू होते. या गंभीर दुर्घटनेची सविस्तर माहिती बाहेर येऊ नये, यासाठी ठेकेदाराच्या माणसांनी गर्दीत शिरून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला



व्यवस्थित माहिती देणाऱ्या मजुरांनी काही वेळातच आपली विधाने बदलली. 'माझ्या शेजारी काम करणाऱ्याचे नाव माहीत नाही', 'खाली किती लोक होते ते आठवत नाही', अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन दिशाभूल करण्यात येत होती. दरम्यान, घटनेनंतर राठोड नावाचा मुख्य ठेकेदार घटनास्थळावरून पसार झाला असून, पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. मुख्य रस्त्याला लागून असलेल्या या इमारतीचे बांधकाम गेल्या सहा महिन्यांपासून सुरू आहे. तळमजल्यावर पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून, त्यावर स्लॅब टाकण्याचे काम सुरू होते. स्लॅबचा आधार देणारा सपोर्ट कमकुवत झाल्याचे लक्षात आल्याने मजूर तो दुरुस्त करण्यासाठी खाली गेले होते. त्याच वेळी अचानक स्लॅब कोसळला. अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी अशोक खांडेकर, पोलिस उपायुक्त रत्नाकर नवले, पोलिस निरीक्षक गणपत राहिरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या वेळी महापौर समीर राजूरकर, विरोधी पक्षनेते समीर बिल्डर आणि नगरसेवक काकासाहेब काकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन मदतकार्याची पाहणी केली. स्लॅब प्लेटला आधार देण्यासाठी खालच्या बाजूला लोखंडी सपोर्ट लावण्यात आला होता, जो काहीसा खिळखिळा झाला होता. हा सपोर्ट निखळल्यास संपूर्ण स्लॅब कोसळेल, या भीतीने ४ मजूर तो दुरुस्त करण्यासाठी स्लॅबच्या खाली गेले होते. मात्र, खालच्या बाजूला एक उघडी बारव (विहीर) असल्याने तिथे भक्कम सपोर्ट देणे शक्य होत नव्हते. परिणामी, वरचा समतोल (बॅलन्स) बिघडत होता. सपोर्ट दुरुस्त करत असतानाच एका बाजूचा स्लॅब अचानक कोसळला. या वेळी तीन मजूर बाहेरच्या दिशेने पळाल्याने बचावले, तर एक आतल्या दिशेने पळाल्याने अडकल्याची दाट शक्यता आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शनिवार दि.३१ ऑक्टोबर २०२६ | ६

माजलगावात दोन सराफांना ४४ लाखांचा गंडा!

दागिने घडविण्याच्या बहाण्याने ३० तोळे ४ ग्रॅम सोने घेऊन कारागीर पसार, बंगाली कारागिरासह तिघांविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात दागिने घडवून देण्याच्या बहाण्याने दोन सराफ व्यावसायिकांची तब्बल ४४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दागिने तयार करण्यासाठी विश्वासाने दिलेले ३० तोळे ४ ग्रॅम सोने घेऊन कारागीर पसार झाल्याने सराफ व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी बंगाली कारागिरासह तिघांविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुन्हा फसवणुकीची घटना; सराफ व्यावसायिकांमध्ये चिंता!

माजलगाव शहरात यापूर्वीही सराफ व्यावसायिकांची फसवणूक झाल्याच्या घटना घडल्या आहेत. दागिने घडविण्याच्या कामासाठी कारागिरांवर विश्वास ठेवून मोठ्या प्रमाणात सोने दिले जाते. मात्र, अशा प्रकारे कारागीर सोने घेऊन पसार होत असल्याने सराफ व्यावसायिकांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून संबंधित आरोपींचा शोध घ्यावा आणि फसवणूक झालेल्या व्यावसायिकांचे सोने परत मिळवून द्यावे, अशी मागणी होत आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव शहरातील दोन सराफ व्यावसायिकांनी दागिने तयार करून घेण्यासाठी कारागिराकडे सोने दिले होते. संबंधित कारागिराने विश्वास संपादन करून दागिने तयार करून देण्याचे आश्वासन दिले.मात्र,दागिने तयार करून देण्याऐवजी त्याने दिलेले सोने घेऊन पोबारा केला.या प्रकारात तब्बल ३० तोळे ४ ग्रॅम सोने लंपास करण्यात आले असून, बाजारभावानुसार या सोन्याची किंमत सुमारे ४४ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणात देभुनभेकुमार सरसमल,त्यांची पत्नी सुमित्रा सरसमल आणि अन्य एक यांनी सराफ व्यावसायिकांची फसवणूक झाल्याचे वृत्त आहे. संबंधित कारागिराने मोबाईल बंद करून संपर्क तोडल्याने संशय अधिक बळावला. वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही कारागीर मिळून न आल्याने अखेर पोलिसांत धाव घेण्यात आली. या घटनेची माहिती समोर आल्यानंतर माजलगाव शहरातील सराफ बाजारात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः बाहेरगावाहून येणाऱ्या कारागिरांकडे दागिने तयार करण्यासाठी सोने देताना व्यावसायिकांनी अधिक खबरदारी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

शासकीय कार्यालये, शाळा परिसरात कोटपा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी – जिल्हाधिकारी जॉन्सन



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाच्या परिसरात कोणीही मावा खाऊन थुंकू नये, यासाठी संबंधित विभागाने आरोग्य विभागापासून सुरुवात करून जिल्ह्यातील सर्व कार्यालय परिसरात कोटपा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच शाळेच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ दिसता कामा नयेत. शाळा परिसरात नियमांचे उल्लंघन करून मावा खाऊन थुंकणाऱ्यावर मुख्याध्यापकांनी कोटपा कायद्यांतर्गत थेट दंडात्मक कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी

◀◀ पान ३ वर

युवासेनेचा रॅपिडोला दणका!

बीडमध्ये बाईक टॅक्सी सेवा विनापरवाना; परिवहन विभागाची अधिकृत कबुली



विपुल पिंगळे यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे तक्रार; परिवहन विभागाकडून दखल घेत कारवाईची प्रक्रिया सुरू

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात सुरू असलेल्या रॅपिडो () बाईक टॅक्सी सेवेच्या कायदेशीर वैधतेचा मुद्दा युवासेनेने उपस्थित केला असून, या प्रकरणी युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी काल, दि. २९ ऑक्टोबर रोजी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती.

बीड शहरात रॅपिडो बाईक टॅक्सी सेवा सुरू असताना कंपनीकडे आवश्यक वैध परवाना आहे का, याबाबत पिंगळे यांनी प्रश्न उपस्थित करत शासनाकडे हस्तक्षेपाची मागणी केली होती. या तक्रारीची दखल घेत उपप्रादेशिक

◀◀ पान ३ वर

योगेश्वरी शिक्षण संस्थेत सिंचन परिषद आयोजनासाठी नियोजन बैठक


अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई यांच्या वतीने जानेवारी २०२७ मध्ये सिंचन परिषदेचे आयोजन करण्याचे प्रस्तावित असून, या परिषदेच्या नियोजनासाठी शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्यालयात नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ जलतज्ज्ञ मा. डॉ. दि. मा. मोरे आणि महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे माजी कार्यकारी संचालक मा. राम घोटे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावित सिंचन परिषदेच्या आयोजनासंदर्भात चर्चा करून विविध विषयांवर विचारविनिमय करण्यात येणार आहे.

सिंचन क्षेत्रातील विविध प्रश्न, पाणी व्यवस्थापन, जलसंधारण, जलसंपत्तीचा योग्य वापर आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्याच्या दृष्टीने या परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. या परिषदेमुळे

◀◀ पान ३ वर



महाराष्ट्र राज्याचे माजी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री व भूम परंडा वाशी मतदारसंघाचे आमदार माननीय आ. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पुणे येथील निवासस्थानी सांत्वनपर भेट देताना संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील व अ.भा.छावा चे प्रदेशाध्यक्ष व शेतकरी नेते विजय कुमार घाडगे पाटील, यांच्यासोबत अ.भा.छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, गंगाधर काळकुटे, धनंजय देशमुख, अंकुश खडके पाटील व इतर छावा मित्रपरिवार.



पिंपळवंडी:–युवा नेते माऊली जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त निबंध स्पर्धा बक्षीस वितरणप्रसंगी अखिल भारतीय जैन संघटना ता.उपाध्यक्ष विलास पटवा,निलेश मोरे,दादासाहेब पवार,नरहरी वाघमारे,केंद्रप्रमुख सौ.मोराळे, मु.अ.येवले,राजु पवार,श्री स्वामी अमृतभारती विद्यालय,जि.प.कें. प्रा.शाळा समिती,ग्रा.पं. पदाधिकारी,शिक्षक बंधू–भगिनी.

कड्याच्या बाजारतळावर पोलिसांचा धडाका! अवैध फटाक्यांच्या साठ्यावर छापा; आठ लाखांचा माल जप्त

आष्टी । प्रतिनिधी

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना आष्टी तालुक्यातील कडा येथील बाजारतळ परिसरात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या फटाक्यांच्या साठ्यावर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पोलीस निरीक्षक सूर्यवंशी साहेब आणि त्यांच्या पथकाने अचानक छापा टाकून तब्बल आठ लाख रुपये किमतीचा फटाक्यांचा साठा जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांची धडक कारवाई; संबंधित व्यावसायिकाविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कडा येथील बाजारतळ परिसरात शेख बनिमिया यांच्या गोदामामध्ये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात फटाके साठवून ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान सुमारे आठ लाख रुपये किमतीचा फटाक्यांचा साठा पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

अवैध साठवणुकीचा मुद्दा ऐरणीवर

दिवाळीच्या काळात फटाक्यांची मागणी वाढत असताना त्यांची साठवणूक आणि विक्री करताना आवश्यक परवानग्या, सुरक्षिततेचे नियम आणि संबंधित कायदेशीर अटींचे पालन करणे महत्त्वाचे असते. फटाक्यांसारख्या ज्वलनशील वस्तूंची नियमबाह्य पद्धतीने साठवणूक केल्यास आग लागण्याचा किंवा स्फोटाचा धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः बाजारतळासारख्या वर्दळीच्या ठिकाणी अशा साठवणुकीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते.

या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेली ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे. संबंधित ठिकाणी फटाक्यांचा साठा कोणत्या परवानगीच्या आधारे करण्यात आला होता, साठवणुकीसाठी आवश्यक नियमांचे पालन झाले होते का आणि या प्रकरणात नेमके कोणते कायदेशीर उल्लंघन झाले आहे, याची पडताळणी तपासातून स्पष्ट होणार आहे.

संबंधिताविरुद्ध

◀◀ पान ३ वर

बिंदुसरेचा काठ विस्तारणार– शेख निजाम

संत सावता महाराज मंदिर ते ब्र.गोविंदपंत समाधी रस्ता स्वच्छ

बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेच्या स्वच्छता विभागाने बिंदुसरा नदीच्या लगत रस्ता स्वच्छता केला असून सभापती शेख निजाम यांनी सदरील मार्गनिका विस्तार हा दूरगामी विषय असल्याचे सांगितले . नेते आ विजयसिंह पंडित नगर अध्यक्ष प्रेमलताताई पारवे, मुख्याधिकारी मांडुरके, स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव यांच्या मार्गदर्शनात सर्व सभापती नगरसेवक तथा विधानसभा



समन्वयक शेख मुजीब यांच्या समवेत विविध स्वच्छता उपक्रम मार्गी लागत असल्याचे सांगितले

◀◀ पान ३ वर

दहा वर्षांचा घन कचरा पहिल्यांदा उचलला

बिंदुसरा म्हणजे डम्पिंग ग्राउंड प्रमाणे कचरा टाकून भरली होती . आज जिसेबींचा ताफा घेऊन स्वच्छता सभापती नदी पात्रात उतरले . गेल्या दहा वर्षातल्या जमलेल्या कचऱ्यात पहिल्यांदा जिसेबीने तोंड घातले ज्यामुळे नदी पात्र स्वच्छ आणि रस्ता रुंद होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

बलात्कार व ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय; सबळ पुराव्याअभावी आरोपींची निर्दोष सुटका

आष्टी । प्रतिनिधी

बलात्कार आणि ॲट्रॉसिटीसारख्या गंभीर गुन्ह्यांत दाखल असलेल्या प्रकरणात बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालामुळे संबंधित प्रकरणाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून, आरोपींच्या वतीने ड. सचिन सयाजीराव जायभाये यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडली.

या प्रकरणातील फिर्यादी महिलेने ५ जुलै २०२३ रोजी आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, १३ मार्च २०२३ रोजी सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास आरोपीच्या घरी उसने दिलेले तीन लाख रुपये मागण्यासाठी गेली असता आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच आरोपी जानकीराम बापू गव्हाणे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिल्याचा आणि यापूर्वीही आमिष दाखवून अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीने केला होता. या तक्रारीवरून पोलिसांनी बलात्कार आणि ट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता.या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयात विशेष खटला क्रमांक १३३/२०२३ नुसार या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले.मात्र, आरोपींच्या बचाव पक्षाने मांडलेले युक्तिवाद आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार करता सरकार पक्षाला आरोप सिद्ध करण्यात यश आले नाही. त्यामुळे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. सुराणा साहेब यांनी २१ ऑक्टोबर २०२६ रोजी या प्रकरणातील जानकीराम बापू गव्हाणे (रा. वेलतुरी, ता. आष्टी, जि. बीड) यांच्यासह अन्य दोन आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय दिला.या खटल्यात आरोपींच्या वतीने ड. सचिन सयाजीराव जायभाये यांनी काम पाहिले. त्यांना ड. अभिजित एस. गव्हाणे आणि ड. एजाज शब्बीर मोमीन यांनी सहकार्य केले.

पाटोद्यात परवानाधारक सावकार शुन्यावर विनापरवाना खासगी सावकारींचा बळावतोय विळखा!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात खासगी सावकारीचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत चालल्याचे चित्र समोर आले आहे. एकीकडे प्रशासकीय लालफितीच्या कारभारामुळे किंवा मुदतवाढीअभावी परवाने रद्द झाल्याने तालुक्यात एकही वैध परवानाधारक सावकार उरलेला नाही; तर दुसरीकडे या परिस्थितीचा गैरफायदा घेत शहरासह ग्रामीण भागात विनापरवाना व मनमानी खासगी सावकारी राजरोसपणे सुरू असल्याची चर्चा आहे.

परवाने झाले निलंबित, पण अवैध धंदे सुरूच

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार कोणताही खासगी सावकारी व्यवसाय करण्यासाठी वैध परवाना असणे बंधनकारक आहे. मात्र, पाटोदा येथील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेले तीन परवाने ३१ मार्च २०२६ पर्यंत नूतनीकरण न झाल्यामुळे अधिकृतपणे निलंबित करण्यात आले आहेत. परिणामी, सध्या पाटोदा तालुक्यात एकही कायदेशीर परवानाधारक सावकार अस्तित्वात नाही. असे असले तरी, प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी छुप्या पद्धतीने भरमसाठ व्याज उकळण्याचे प्रकार सुरूच असल्याचे बोलले जात आहे.

गरजूंची आर्थिक पिळवणूक आणि दहशतीचे सावज

दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक विवंचनेमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक अनेकदा तातडीच्या (गरजेपोटी) खासगी सावकारांच्या दारात जातात. याचा गैरफायदा घेऊन काही मुठभर सावकार अवाजवी व्याजदर आकारत आहेत. काही प्रकरणांत तर कर्जाच्या बदल्यात गरिबांची घरे, शेतजमिनी बळकावल्या जात असल्याच्या तक्रारीही होत आहेत. परंतु, सामाजिक भीती आणि बदनामीच्या पाशापोटी पीड?त नागरिक उघडपणे तक्रार करण्यासाठी पुढे येत नसल्याने या अवैध सावकारांचे फावले आहे.

सहकार आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त पावले उचलावीत

फक्त कागदी घोडे नाचवण्यापेक्षा प्रत्यक्ष ग्राउंडवर कारवाई होणे गरजेचे आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली धमक्या देणे, मारहाण करणे किंवा बळकावणी करणे यांसारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी सहकार विभागाने केवळ तक्रारींची वाट न बघता संशयास्पद व्यवहारांची दप्तरे तपासावीत. तसेच, पोलिस प्रशासनाने अशा मुजावर सावकारांवर कठोर कायदेशीर बडगा उगारण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

◀◀ पान ३ वर

इनाम जमीनधारकांच्या हक्कासाठी मराठवाड्यात आक्रोशाचा एल्गार!



माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्यातील देवस्थान इनाम जमीनधारकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज बुलंद

आक्रोश मेळाव्यास मराठवाड्यातील इनाम जमीनधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे – हरी गिरी

करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या आक्रोश मेळाव्यास मराठवाड्यातील सर्व इनाम जमीनधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन दशनाम गोसावी समाज परिषदेचे हरी गिरी यांनी केले आहे.

देवस्थान इनाम जमीनधारकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच संबंधित समाजबांधवांच्या मागण्यांना बळ देण्यासाठी या आक्रोश मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. देवस्थान इनाम जमीन कृती समिती, महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष तथा गुरव समाजाचे नेते अण्णासाहेब शिंदे, परशुराम हिंदू सेवा संघाचे विश्वजित देशपांडे, देवस्थान इनाम जमीन कृती समिती महाराष्ट्र राज्य तथा दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष ॲड. राजेंद्र बन आणि ह.भ.प. दत्ता महाराज गिरी यांच्या नेतृत्वाखाली हा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात मराठवाड्यातील दशनाम गोसावी

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26